मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
( ठाणे जिल्हा वाचनालय )   वाचनालय / संदर्भ / नौपाडा
च. ५६ सन १८९२
प्र. बाबाजी आणि कं.
पु. वामन पंडितांचे-चरित्र

५६
चरित्र

ग्रंथ संग्रहालय
ग्रंथ ९६७
ता. २०/९/८३
ठाणे.

ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

सन १८९२

ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........
ठाणे.

बाबाजी आणि कंपनी मुंबई
इंडियन प्रेस-मुंबई
सन १८९२

दातेसूची पान ९२५

श्रीः

# वामन पंडितांचें चरित्र.

ठाणे.

बहुतेक साधुसंतांचीं चरित्रें महीपतिबोवांनीं लिहून [illegible] आहेत, सें वामनाचें एकादें चरित्र त्यांनीं किंवा अन्य कोणीं लिहून ठेविलें नाहीं, यांचें पुष्कळांस नवल वाटतें. वामन पंडित म्हणजे सामान्य हरिभक्त होते असें नाहीं. ते निःसीम भक्त असून भक्तीचें व आत्मज्ञानाचें लग्न त्यांनींच पहिल्यानें लावून दिलें हें सांगायासच नको. त्यांच्या सर्व ग्रंथांत तत्त्वज्ञांस शीं हरिभक्तीची अत्यंत आवश्यकता प्रतिपादन केलेली पदोपदीं ष्टीस पडते, तशी अन्य ग्रंथांत नाहीं. ते प्रेमळ जीवन्मुक्त हरिभक्त होते, परंतु त्यांच्या हातून एकही अद्भुत चमत्कार झाला नाहीं, म्हणूनच र त्यांला साधुमालिकेंत ओंविलें नसेल तर कोण जाणे! किंवा ते सत्य- प्रिय व निस्पृह असल्या कारणानें त्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेवर टीका करतेवेळीं कित्येक शब्दांचा अर्थ अन्य टीकाकारांस समजला नाहीं असें स्पष्ट सां- गितल्याबद्दल इतर टीकाकारांच्या अनुयायांचा त्यांवर रोष झाला असा- वा, व ते संतमालिकेंत ओंवण्याजोगे साधु नव्हत, यास्तव त्यांस त्या चरि- त्रांच्या हद्दपार करावें असें त्यांनीं मनांत आणिलें असावें.

वामन पंडितांचें जन्म शके १५४० च्या सुमारास झालें असावें. यां-

१. रामदास स्वामी व वामन पंडित समकालीन हें निर्विवाद आहे. दासांपेक्षा मन ९–१० वर्षांनीं लहान असावेत. शास्त्राध्ययनासाठीं काशीस जातांना पंडित आपले पत्नीस समागमें घेऊन गेले असें चौबळकृत रामदासाच्या चरित्रांत लिहिलें आहे, व बारा वर्षें काशींत राहून शास्त्राध्ययनादि करून पंडित स्वदेशास परत येत असतां बरोबर त्यांची पत्नी गिराबाई होती, असें गोवर्धनदास यांणीं छापलेल्या रामदासांच्या बखरींत सांपडतें. यावरून महायात्रेस जाण्याच्या पूर्वीं त्यांचें लग्न झालें होतें असें ठरतें. गिराबाई जर अल्पवयी असती तर ते तिला समा- गमें घेऊन जाण्यास धजलेच नसते. ती त्या वेळीं निदान १४–१५ वर्षांची व पंडित सुमारें १७–१८ वर्षांच्या वयाचे असावेत. पुढें ते काशींत १२ वर्षें राहिले, हलें म्हणजे ज्या वेळीं ते स्वदेशास परत आले त्या वेळीं त्यांचें वय ३०–३१ वर्षांचें असावें. पंडित आले तेव्हां तुकाराम बोवा हयात होते. कारण रामदास

च्या तीर्थरूपाचें नांव नृहरि पंडित, हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण सातारा जिल्ह्यांत कोरेगांव कुमटें ह्मणून आहे, तेथले ज्योतिषी असून मध्वसंप्रदायी होते. यांचें गोत्र शांडिल्य व कुलदेव नृसिंह. यांच्या आईचें नांव लक्ष्मीबाई. ही गुणांनीं केवळ लक्ष्मीच होती असें वामन पंडित स्वतः सांगतात. तेव्हां वामन पंडितांचें बाल्यावस्थेंत लालनपालनादि उत्तम प्रकारें झालें असावें. लाडानें वाढविल्यावर मुलाचे सुखसोहळे पहाण्याची जी मातुश्रीला स्वभावतः हौस असते ती पुरविण्यासाठीं तिणें व्रतबंध व गिराबाईशीं त्यांचा विवाहही लहानपणींच करविला असावा.

बाप पंडित होता व वामन पंडित तीक्ष्णबुद्धीचे असल्यामुळें लहानपणें जो त्यांचा वेदाध्ययनाचा व संस्कृताचा अभ्यास व्हावयाचा तो यथायोग्य झाला असावा आणि त्यावरूनच त्यांस शास्त्राध्ययनाची अभिरुचि उत्पन्न झाली असावी. पुढें वामनाचीं मातापितरें निवर्त्तलीं असावीं असें वाटते. असें झालें नसतें तर काशीस जातांना पंडितांला पत्नीस बरोबर घेऊन जाणें अगत्य पडलें नसतें. स्त्री ही एक विद्याभ्यासास मोठी आडकाठी; तित गांवीं ठेवायाची सोय असती तर जाणूनबुजून त्यांनीं तिला संगातीं नें नसतें. शास्त्राध्ययनाच्या अभिरुचीनें त्यांच्या मनांत विद्यासाधनाचें माहेर घर जें महाक्षेत्र काशी तेथें जाण्याची उत्कट इच्छा उत्पन्न केली; त्यामुळें घरच्या जिनगीची व्यवस्था लावून आपले पत्नीसह काशीयात्रेस गेले.

हें प्रयाण पंडितांच्या तारुण्यांतच झालें असावें, यांत संशय नाही. बायकोस बरोबर घेऊन जाणें केवळ ज्वानींत आलेल्या पुरुषापासूनच

प्रथमच पंढरपुरास गेले, त्या दिवशीं तुकाराम बोवांचें कीर्तन झालें; व दुसऱ्या दिवशीं रामदासांचें झालें. या दोन्हीं कीर्तनांस वामन पंडित व दुसरी संतमंडळी हजर होती, असें महीपति लिहितो. ( संतवि० अ० १०. )

ही गोष्ट १५७१ च्या आषाढांत झाली ( चौ० रा० च० पृ० ११५-१८ ) फाल्गुनांत तुकाराम गुप्त झाले. याच वर्षी वामन पंडित स्वदेशास परत आलें असावे. हें अनुमान खरें असल्यास त्यांचें वय या वेळीं ३१ वर्षांचें ठरतें. यावरून त्यांचें जन्म शके १५४० त झालें असावें अशी अटकळ निघते.

१. ताताभिधा नृहरिपंडित माय लक्ष्मी, जे सर्वदा सुगुणयुक्त उदार लक्ष्मी। शांडिल्य गोत्र कुलदेव नृसिंह ज्याचा, दासानुदास निजवामन हो अजाचा ॥१॥

भीष्मप्रतिज्ञा.

होईल; बाल्यावस्थेंत व्हावयाचें नाहीं. शिवाय तेव्हांची महायात्रा आतांच्या महायात्रेसारिखी नव्हती. मार्गांत पुष्कळ अडचणी येत होत्या व भयंकर प्रसंग गुदरण्याची त्या वेळीं भीति होती. हे विचार मनांत आले म्हणजे पंडितांचें वय तेव्हां १८ वर्षांचें तरी असावें असें वाटतें.

पुढें बारा वर्षें काशींत राहून त्यांनीं शास्त्राध्ययन केलें. ग्रंथावलोकनानें त्यांच्या बुद्धीचा प्रभाव वाढला. मोठमोठ्या पंडितांशीं वादविवादांचे त्यांना प्रसंग येऊं लागले. त्यांत त्यांना यश येत चाललें व चहूंकडे त्यांची कीर्ति पसरली.

ज्या महापंडितांपाशीं ते विद्याभ्यास करीत होते त्यांच्या कानांवर हा सुकीर्तिघोष आला. त्यांना त्याचा फार आनंद होऊन वामनांच्या वादशक्तीचें प्रमाण काढावें अशा हेतूनें एक दिवस स्वतः त्यांनीं-च त्यांशीं सहजरीत्या वादास आरंभ केला. तेथेंही पंडितांस यश आलें. गुरूजींनीं या गोष्टीचा संतोष मानून 'पुत्रादेके पराजयं शिष्यादेके पराजयं' असें म्हणून वामनांचें गौरव केलें. नंतर गुरूची आज्ञा घेऊन पंडित जन्मभूमीस यावयास निघाले, त्या समयीं क्षेत्रवासी पंडितांनीं सभा करून त्यांस मानपत्रें दिलीं.

बरोबर गिराबाई, एक दोन शागीर्द व उंटावर लादून कांहीं दुर्मिळ शास्त्रीय ग्रंथ घेऊन पंडितांची स्वारी महाक्षेत्रांतून निघाली ती देशोदेशीं दिग्विजय करीत करीत व मानपत्रें घेत घेत सुरक्षित इंद्रायणीच्या तीरीं अलकावतीस येऊन थडकली. ते येथें पोंचायाच्या पूर्वींच त्यांच्या दिग्विजयाची बातमी सर्व दक्षिणभर पसरली होती. जेथें तेथें त्यांच्या विद्वत्तेची व वादशक्तीची तारीफ होऊं लागली होती. तेणेंकरून कर्म-क्षेत्राभिमानी नामधारी शास्त्रीबोवांस व कांहीं दुराग्रही ब्राह्मणांस त्यांच्या आगमनाची दहशत पडली असें वाटतें.

या समयीं सर्व महाराष्ट्र देशांत वामन पंडितांच्या जोडीचा त्यांशीं वाद करण्यासारिखा एकही महापंडित नव्हता असें दिसतें. तो काळच तसा होता. देशभर मोंगलाई माजली होती, तिची जरी मोडकळीची वेळा समीप येऊन महाराष्ट्र पादशाहीच्या पायाची सुरवात झाली होती तरी शेंकडों वर्षें मुसलमानांपासून झालेल्या धर्मोच्छेदाचा परिणाम दक्षिणेंत एवढा गाजला होता कीं, सर्व शास्त्रांस व त्यांच्या अनुयायी पंडितमंड-ळीस महायात्रेचीच वाट धरावी लागली होती. राजदरबारीं, न्याय-

मंदिरीं, अथवा धर्मसमाजांत धर्माधर्मकर्माकर्मनिर्णयप्रसंगीं पंडितांची जरुरी लागायाची, परंतु राज्यक्रांतीमुळें तशीं स्थानें देशांत राहिलीं नव्हतीं; मग पंडितमंडळीला विचारतो कोण? दरवडे, मारामारी, हाणाहाणी, धर्मच्छल इत्यादि गोष्टी जारीनें सुरू होत्या. केव्हां कसा प्रसंग येईल याचा नियम राहिला नव्हता. महाराष्ट्रियांच्या मनाची शांतता अगदीं उडून जाऊन हतवीर्य झालेल्या मानवी प्राण्यांचा जो शेवटला उपाय, ह्मणजे हातपाय गाळून सर्व भरिभार ईश्वरावर टाकून स्वस्थ बसायाचें, त्या थरास त्यांची स्थिति येऊन पोंचली होती. अशा उदास वृत्तीमुळें कांहीं दिवसांपासून चहूंकडे साधुमंडळ बरेंच उदयास येत चाललें होतें. लोकांचीं मनें या साधुमंडळीनें आकर्षित केलींच होतीं; तथापि त्यांच्या अद्भुत चमत्कारांनीं धर्माचा कायमचा पगडा जेवढा लोकांच्या मनावर बसवून दिला, तसा अन्य कोणत्याच उपायांनीं बसला नसता. त्यांचा त्रिमपण विजर्यार. व धर्मानुयायांवर एवढा बसला कीं, ते त्यांसाठीं प्राण आटणीस पाड-
वाल ! असो. परंतु जर आपल्यासारखे, ह्यापैकीं न चुकवायाची असेल तर साधुसमागम धरा, मस्तक ठेंगणा करा व ह्या आपल्या अफाट विद्येचा सद्यः असलेल्या व पुढें होणाऱ्या असंख्य महाराष्ट्र जनांच्या नित्यसुखासाठीं सदुपयोग करा. हीच माझी आपल्यापाशीं विनंती आहे."

वादरीतींत निष्णात पंडितांनीं हें युक्तिशास्त्र शांतपणें ऐकून घेऊन त्यास ह्मटलें कीं— 'तुह्मांसारिखा सत्पथोपदेशक ब्रह्मराक्षस मी आजच पाहिला. आह्मांवर हा तुमचा अनुग्रहच ह्मणायाचा! ह्मणून आह्मासाठीं नेमलेल्या स्थलाचें मी तुह्मांस गुरुदक्षणेदाखल अर्पण करितों. तुह्मीं तेथें आनंदानें आचंद्रार्क वास करावा.'

वेदशास्त्रपारंगत असून देशपर्यटणानें व भिन्नभिन्न स्वभावाच्या पुरुषांच्या संघट्टनानें ज्या पंडितांची बुद्धि अत्यंत तीक्ष्ण झालेली त्यांना जर या वेषधारी ब्रह्मराक्षसाच्या कपटाचें परीक्षण झालें नाहीं, किंवा त्याच्या युक्तिशास्त्राचें इंगित समजलें नाहीं तर तें दुसरे कोणास समजायाचें बरें? महापंडितांनीं कोठें असल्या पिशाचयोनीची परवा केलेली कोणीं ऐकिली आहे काय? परशुरामाचे वेळीं जशी पृथ्वी निःक्षत्रिय झाली होती, तसाच या राज्यक्रांतीच्या समयास महाराष्ट्रदेश निःपंडित झाला आहे, असें तेव्हांच त्यांच्या लक्ष्यांत आलें असावें, व ते तेथून निघून आपल्या गांवीं गेले असावे.

त्यांनीं आपल्या मतें ही एक उत्कृष्ट युक्ति शोधून काढिली आणि एका धूर्त व वाचस्पति ब्राह्मणास ती पढवून वामनपंडितांकडे पाठविलें असावें.

स्नानसंध्यादि नित्यकर्म आटपून भोजनोत्तर पंडित चार आळंदीकर ब्राह्मणांशीं गोष्टी बोलत बसले आहेत इतक्यांत हा ब्राह्मण तेथें आला. नमस्कारादि शिष्टाचार झाल्यावर या ब्राह्मणानें 'मला कांहीं आपल्याशीं एकांतीं बोलावयाचें आहे' अशी पंडितांपाशीं विनंती केली. पंडित आदरातिथ्यांत निष्णात व निर्मलांतःकरणाचे त्यांनीं जवळ असलेल्या सर्व मंडळीस दूर करून त्यास 'बोला' ह्मणून सांगितलें. तेव्हां तो ब्राह्मण ह्मणाला "महाराज! मी ब्रह्मराक्षस आहें ज्या अश्वत्थ वृक्षावर मी

---

केलें आहे त्यांत, काव्येतिहासांतील वामन चरित्रांत व अन्य जुनाट लेखांत ही गोष्ट आळंदीसच घडली असें आहे. शिवाय त्यावेळीं षड्दर्शनादि पढून पंडित ह्मणवून घ्यायाचीं साधनेंही दक्षिणेंत नसतां वामन पंडित येथून तयार होऊन्या बीतर्क मोठमोठाल्या शहरांतून ह्मणणें असंभाव्य होतें; यास्तव पसरतच होत्या, त्या वामनपंडितांच्या एकांतवासी कोरेगांवच्या आश्रमद्वारावर जाऊन प्रहार करूं लागल्या. ते जेवढे विद्वान होते तेवढेच हरिभक्त होते. समता तशीच दया पंडितांमध्यें पूर्णपणें वास करीत होती. लहानपणापासून विष्णुभक्तीचा छंद असल्यावांचून पंडितलोकांचें अंतःकरण तिकडे वळणेंच कठीण. तेव्हां हे मूळचेच हरिभक्तिपरायण होते असें दिसतें. या अद्भुतचमत्कारांच्या गोष्टी ऐकून त्यांच्या मनांत असें आलें असावें कीं, ज्या देशांत शास्त्रज्ञांचा किंवा पंडितांचा एवढा अभाव, त्याच देशांत काय साधुजनांचें ऐश्वर्य हें! तर यांची ईश्वरप्रीति आत्मप्रीतीपलीकडे असावी. योगज्ञान यांना करतलामलवत् असावें. यांना आत्मज्ञानाची [illegible]. काशीसारख्या पुण्यक्षेत्रांत, जेथें, तेत्तीस कोटि देवांचा मेळा पाप्यांस पुण्यवान् करण्यासाठीं सतत जागतो, जेथें विष्णुपदवाहिनी गंगा पातकी जनांचे पापमल धुण्यासाठीं रात्रंदिवस वाहत आहे, जेथें शास्त्रीय विषयांच्या कोटिक्रमांनीं महापंडितांचीं ज्ञानभांडारें वेडावून जातात, तेथें ज्या अमानुष साधूंचा दुष्काळ त्यांचाच स्वदेशीं केवढा सुकाळ हा!

बऱ्याच दिवसांपासून पंडितांचें लक्ष्य बौद्ध, जैन, शांकर, माध्व, वल्लभ, रामानुज इत्यादि मतांच्या सिद्धांतांच्या विचारांत गुंतलें होतें. पुढें शांकरमतच श्रुतिस्मृतीस अनुसरून आहे व इतर मतें भेदाश्रित आहेत असा यांचा

रहात होतों, तो वृक्ष विच्छिन्न झाला. मला राहण्यास स्थळ नाहींसें झालें आहे. या इंद्रायणीच्या तीरीं एक अश्वत्थ वृक्ष आहे त्यास तीन खांद्या आहेत. दोहोंवर दुसरे दोघे ब्रह्मराक्षस राहतात व तिसरी रिकामी आहे, तीवर माझें रहावयाचें स्थान करावें ह्मणून मी तेथें गेलों तेव्हां ते दोघे-ही ब्रह्मराक्षस ह्मणाले कीं, हें स्थान तुह्मांला मिळावयाचें नाहीं. याची योजना एका महापंडिताकडे झाली आहे. ते कोण ह्मणाल तर जे परवांचे दिवशीं येथें येऊन उतरले आहेत ते वामन पंडित. त्यांची जर तुह्मीं परवानगी आणाल तर ह्या स्थानाचा उपभोग घेण्यास आह्मांकडून तुह्मांस मनाई व्हावयाची नाहीं. त्यांच्या या भाषणावरून मी आपली परवानगी मागायास आलों आहें. आपण जें कर्म हल्लीं करितां तेंच कर्म मागें आह्मीं करीत होतों. त्याचमुळें ही योनि आह्मांस प्राप्त झाली. ही पापयोनि तर खरीच परंतु त्रिकालज्ञान या योनींत आहे. या क्षेत्रांत तर [illegible] व्हालच, परंतु स्थानासाठीं आह्मांस मात्र भिक्षाटणास पाठ-वाल! असो. परंतु [illegible] ही [illegible] चुकवायाची असेल तर साधुसमागम धरा, मस्तक ठेंगणा करा व ह्या आपल्या अफाट विद्येचा सद्यः असलेल्या व पुढें होणाऱ्या असंख्य महाराष्ट्र जनांच्या नित्यसुखा-साठीं सदुपयोग करा. हीच माझी आपल्यापाशीं विनंती आहे."

वादरीतींत निष्णात पंडितांनीं हें युक्तिशास्त्र शांतपणें ऐकून घेऊन त्यास ह्मटलें कीं—'तुह्मांसारिखा सत्पथोपदेशक ब्रह्मराक्षस मी आजच पाहिला. आह्मांवर हा तुमचा अनुग्रहच ह्मणायाचा! ह्मणून आह्मासाठीं नेमलेल्या स्थलाचें मी तुह्मांस गुरुदक्षणेदाखल अर्पण करितों. तुह्मीं तेथें आनंदानें आचंद्रार्क वास करावा.'

वेदशास्त्रपारंगत असून देशपर्यटणानें व भिन्नभिन्न स्वभावाच्या पुरुषां-च्या संघट्टनानें ज्या पंडितांची बुद्धि अत्यंत तीक्ष्ण झालेली त्यांना जर या वेषधारी ब्रह्मराक्षसाच्या कपटाचें परीक्षण झालें नाहीं, किंवा त्याच्या युक्तिशास्त्राचें इंगित समजलें नाहीं तर तें दुसरे कोणास समजायाचें बरें? महापंडितांनीं कोठें असल्या पिशाचयोनीची परवा केलेली कोणीं ऐकिली आहे काय? परशुरामाचे वेळीं जशी पृथ्वी निःक्षत्रिय झाली होती, तसाच या राज्यक्रांतीच्या समयास महाराष्ट्रदेश निःपंडित झाला आहे, असें तेव्हांच त्यांच्या लक्ष्यांत आलें असावें, व ते तेथून निघून आपल्या गांवीं गेले असावे.

या समयास देहूस तुकारामबोवा, कृष्णातीरीं चांफळखोऱ्यांत राजगुरु रामदासस्वामी, वडगांवीं जयरामस्वामी, वारणातीरीं बाळस्वामी, ब्रह्म-नाळ्यास रघुनाथस्वामी, निगडींत रंगनाथस्वामी व त्यांचे बंधु आत्यास्वामी, आनंदमूर्ती, पाटगांवास मानी बोवा, त्र्यंबक नारायणाश्रम बोवा, संगमे-श्वरीं अचलपुरी गोसावी, धामणगांवांत बोधले बोवा, भागानगरास केशवस्वामी, पोलादपुरीं परमानंद बोवा, चिंचवडास मोरया देव धरणीधर, पैठणास निंबराज, अनंतसिद्ध व चांभारगोंद्यास शेक महंमद अशी बरीच संतमंडळी उदयास येऊन त्यांचा कीर्तिसूर्य ऐन मध्यान्हीं आला होता. राजापासून रंकापर्यंत या साधूंचे अंकित झाले होते. कोणाच्या पंक्तीस बसून विठोबारखुमाई जेवलीं, तर कोणाचे घरीं गणपतीनें मोदकांचा फराळ केला. कोणी नदीप्रवाहांत गुप्त होऊन सात दिवसांनीं बाहेर पडला नाहीं, इतक्यांत कोणी मध्यान्हीं शिदासामग्री मिळाली नाहीं ह्मणून टोणगा मा-रून खाल्ला व त्यास जिवंत केलें. अशा अद्भुत चमत्कारांच्या बातम्या मोठमोठाल्या शहरांतून कांहीं दिवसांआड सर्वत्र पसरतच होत्या, त्या वामनपंडितांच्या एकांतवासी कोरेगांवच्या आश्रमद्वारावर जाऊन प्रहार करूं लागल्या. ते जेवढे विद्वान होते तेवढेच हरिभक्त होते. समता तशीच दया पंडितांमध्यें पूर्णपणें वास करीत होती. लहानपणापासून विष्णु-भक्तीचा छंद असल्यावांचून पंडितलोकांचें अंतःकरण तिकडे वळणेंच कठीण. तेव्हां हे मूळचेच हरिभक्तिपरायण होते असें दिसतें. या अद्भुतच-मत्कारांच्या गोष्टी ऐकून त्यांच्या मनांत असें आलें असावें कीं, ज्या देशांत शास्त्रज्ञांचा किंवा पंडितांचा एवढा अभाव, त्याच देशांत काय साधुजनांचें ऐश्वर्य हें ! तर यांची ईश्वरप्रीति आत्मप्रीतीपलीकडे असावी. योगज्ञान यांना करतलामलवत् असावें. यांना आत्मज्ञानाची कळ [illegible]. काशीसारख्या पुण्यक्षेत्रांत, जेथें, तेत्तीस कोटि देवांचा मेळा पाप्यांस पुण्यवान् करण्यासाठीं सतत जागतो, जेथें विष्णुपदवाहिनी गंगा पातकी जनांचे पापमल धुण्यासाठीं रात्रंदिवस वाहत आहे, जेथें शास्त्रीय विष-यांच्या कोटिक्रमांनीं महापंडितांचीं ज्ञानभांडारें वेडावून जातात, तेथें ज्या अमानुष साधूंचा दुष्काळ त्यांचाच स्वदेशीं केवढा सुकाळ हा !

बऱ्याच दिवसांपासून पंडितांचें लक्ष्य बौद्ध, जैन, शांकर, माध्व, वल्लभ, रामानुज इत्यादि मतांच्या सिद्धांतांच्या विचारांत गुंतलें होतें. पुढें शांकरम-तच श्रुतिस्मृतीस अनुसरून आहे व इतर मतें भेदाश्रित आहेत असा यांचा

निश्चय झाला व तो श्रीमद्भागवतांतर्गत आत्मज्ञानानें दृढतर झाला. उपनिषदांच्या अर्थान्वयें ब्रह्मात्मैक्याविषयीं सच्चिदानंदब्रह्मलक्षण आत्म्याकडे कसें लागतें याचें मनन करितां करितां, सत्पदानें आत्मा ब्रह्मासारिखा कालत्रयीं विद्यमान आहे आणि चित्पदानें तो तसाच ज्ञानरूपही आहे, असें पंडितांच्या अनुभवास आलें; तथापि या दुःखमय सृष्टींत तो निरंतर आनंदरूप कसा असावा या शंकेचें निराकरण त्यांना होईना. ही शंका सद्गुरूवांचून दूर होणें कठीण असें जाणून या संतमंडळीचें दर्शन घेऊन होईल तर शंकेचें समाधान करून घ्यावें, असा हेतु धरून, पंडितांनीं पंढरपुरास जाण्याचा विचार केला असावा.

पंडितांची आपल्या पत्नीवर फार प्रीति होती. तशीच गिराबाईही पतिसेवेंत तत्पर असून पंडितांस सोडून एक दिवसही कोठें राहिली नाहीं. ती शहाणी होती व पतिप्रेम तिचें जीवन होतें. उभयतांचेही विचार एक असल्यामुळें संतमंडळीचा दर्शनलाभ घेण्याचा त्यांचा बेत ठरला व तीं उभयतां शके १६७१ च्या आषाढी एकादशीच्या उत्साहास श्रीपांडुरंगाच्या भेटीस निघून गेलीं.

याच वेळेस विठोबानें रामदासांस पंढरीस नेलें होतें व चालतांना रुतलेले त्यांच्या पायांतील कांटे काढिले होते. महीपतिबोवा संतविजयाच्या १० व्या अध्यायांत असें लिहितात कीं, पहिले दिवशीं वाळवंटांत तुकाराम बोवांचें फारच प्रेमळ कीर्त्तन झालें. दुसरे दिवशीं गरुडपारीं रामदासस्वामींचें रसभरित कीर्त्तन झालें. वामनस्वामी, निंबराजबोवा देऊणकर, माणकोजी बोधला, जयराम गोसावी वडगांवकर, शेख महंमद चांभारगोंदेकर, रंगनाथस्वामी व आत्याबोवा निगडीकर वगैरे संतमंडळी

१. वामनी ग्रंथ भाग ४ था पृष्ठ १ निगमसार.... १ ओंव्या ११-१६.

२. प्रियसुधा ह्मणून पंडितांनीं जो ग्रंथ केला आहे तो त्यांहीं आपले पत्नीसाठींच केला. त्याच्या शेवटील पद्यांत ते असें ह्मणतात:—

प्रियसुधा उपदेश गिराप्रती, करुनि वामन तीस ह्मणे सती ।
परम आवडि आपुलि आपणा, वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १८ ॥

वामनी ग्रंथ, भाग ३ रा, पृष्ठ ४१८.

३. चौबळकृत रामदास चरित्र आ० २ री, प्र० ४, पृष्ठ ११६; रामदासाची बखर पृष्ठ १८०; संतविजय अ० ९–१०.

[stamp]

या दोन्ही कीर्त्तनप्रसंगीं हजर होते. वामनपंडितांचें वर्णन त्यांनीं तुकारामाच्या कीर्त्तनप्रसंगीं असें केलें आहे—

वामनस्वामी चतुर पंडित । जो प्रेमळ आणि द्वेषरहित ।
यांणीं दशमस्कंध भागवत । केलें प्राकृत निजबुद्धी ॥ १६ ॥

व रामदास कीर्तनप्रसंगीं—

वामनस्वामी चतुर पंडित । जो वेदांतशास्त्रीं निपुण बहुत ।
त्याहीवरी प्रेमळ भक्त । कविता प्रख्यात जयाची ॥ ७३ ॥

येथें या संतमंडळीची व पंडितांची ही पहिल्यानेंच गांठ पडली. मागाहून त्यांकडून या 'प्रेमळ व द्वेषरहित भक्तास' आपापल्या उपास्यदैवतांच्या किंवा गुरूच्या पुण्यतिथीच्या उत्साहास आमंत्रणें येत असत्या पंडितही त्यांचे तेथें जात असत असें दिसतें.

चाफळास, परळीस व रामघळींत रामदासांपाशीं पंडित कांहीं दिवस राहिले होते असें दिसतें. त्यांस या दिवसांत सच्चिदानंद या पदत्रयांतील 'आनंद' आत्म्यास सतत कोणत्या प्रकारें अनुभवितां येईल या विचाराचा निदिध्यास लागला होता असें मागें सांगितलेंच आहे. त्याच्या समाधानार्थ पंडितांनीं रामदासस्वामींकडे विनंती केली असावी. त्यांच्या उत्तरानें किंवा स्पष्टीकरणानें पंडितांचें समाधान झालें नाहीं. त्यावरून वाद

---

१. चाफळखोऱ्यांत हनुमंतजयंतीस जे साधुसंत आले होते त्यांत पंडितांचेंही नांव आहे. संतवि० अ० १८ ओ० १७९. वडगांवास जयरामस्वामींच्या येथें जन्माष्टमीच्या उत्साहास पंडित हजर होते. संतवि० अ० २२ ओ० ४१. चाफळखोऱ्यांत रामनवमीच्या उत्साहास पंडित होतेः—

वामनस्वामी भक्त थोर, जो व्यास अवतार कलियुगीं. संतवि. अ. २२ ओ. ११७.

२. "सच्चिदानंद पदार्थाविषयींच कोणाही महापंडितास शंका येणें संभवनीय असून, वामनास दुसऱ्या पदार्थाविषयीं शंका आल्याचें त्याच्या ग्रंथावरून दिसत नाहीं. तेव्हां वरील चरित्रांत ( काव्येतिहासांतील वामनचरित्रांत ) जी एक शंका ह्मणून मोघम लिहिलें आहे. ती सच्चिदानंदाविषयींच असावी असेंच मानिलें पाहिजे. जर वर लिहिलेली शंकासमाधानाची गोष्ट रामदासस्वामींच्या संबंधानें घडली हें खरें असतें तर, जेथें वामनानीं त्या गोष्टीचा विशेष विचार केला आहे, तेथें रामदासस्वामींचें नांव घालविण्यास त्याजवळ गुरुभक्ति कमी होती काय ? " बाळकृष्ण मल्हार हंसकृत वामनचरित्र.

३. "स्वामींपाशीं चाफळास, परळीस व रामघळीस कांहीं दिवस राहून (वामनपंडित ) ज्ञानपूर्ण निःसंशय झाले; आणि नेहमीं स्वामींनीं केलेल्या दासबोध

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

उपस्थित [illegible] वामन पंडित विजयी झाल्यामुळें समर्थांस फार राग येऊन त्यांनीं [illegible] धारण केलें. तेव्हां पंडितांनीं कंटाळून 'स्वामी! समस्या पूर्ण झाली.' असें ह्मटलें असावें. परंतु त्यांचा क्रोध शमन झाल्यावर त्यांनीं पुनः विचारल्यावरून वादविषयक शंकेची निवृत्ति झाली नाहीं असें पंडितांनीं स्पष्ट सांगितलें असावें; व त्यामुळें स्वामींचें मन दुखावलें

---

ग्रंथाचें पारायण करीत असतां सातवे दशकीं चौथे ( येथें 'तिसरे' असें पाहिजे) समासीं चवदा ब्रह्में स्थापून उडविलीं. यांपैकीं विचार पहातां चवदा स्थानीं ब्रह्मसंज्ञेविषयीं बहुतग्रंथीं दाखला मिळतो, परंतु उडविल्याचा दाखला कोणत्या ग्रंथीं [illegible] नाहीं, हें पाहून स्वामीसि विचारावयाचें तर सामर्थ्य नाहीं आणि निःसंदेह [illegible] नाहीं, असा विचार करून स्वामींस समक्ष विनंती केली कीं, 'महाराज, [illegible] पारायण मी करितों आणि आपण त्याचा अर्थ स्वमुखें सांगावा.' सम- 'बहुत बरें' असें ह्मणतांच पारायणास आरंभ करून सातवे दशकीं तिसरे [illegible] पारायण आलें. त्या समयीं चवदा ब्रह्मांविषयीं प्रश्न वामनांनीं केला. त्या काळीं स्वामींनीं चवदा ब्रह्में स्थापून उडविलीं. याप्रमाणें स्वामींनीं उडवावीं व वामनांनीं स्थापावीं, असें होत असतां वामनाचा निःसंशय होईना. तेव्हां समर्थ श्रीमारुतीरूपानें भुभुःकार करून शेपटाचा मोठा तडाखा देऊन 'बोल बोल' असें वामनांस ह्मणूं लागले. तों त्यांच्या त्या स्वरूपास पाहून वामन पंडित भयभीत होऊन 'स्वामी, माझी समस्या पूर्ण झाली.' असें बोलले. X X X नंतर स्वामींनीं पूर्वरूप धारण करून 'वामना, तुझी समस्या पूर्ण झाली कीं नाहीं?' असें पुसलें. वामनांनीं 'महाराज! नाहीं' असें उत्तर करितांच समर्थ बोलले 'अरे, पूर्वीं समस्या पूर्ण झाली ह्मणून बोललास आणि आतां नाहीं कां ह्मणतोस?' तेव्हां 'स्वामी आपण आद्यरूप धारण केलें त्याबरोबर बोलायाचें सामर्थ्य कोणाचें आहे?' असें वामनांनीं उत्तर दिलें. तेव्हां स्वामी हास्य करून बोलले कीं, "तुह्मी पंडित सर्व ग्रथांचें अवलोकन करीत असून बरोबर उंटाचे उंट पुस्तकें बाळगून जयपत्रें घेत आलां आणि चवदा ब्रह्में स्थापून उडविलीं हें कोणत्याही ग्रंथीं पाहिलें नाहीं असें ह्मणतां हें आश्चर्य वाटतें. असो. आतां बृहदारण्यांत चवदा ब्रह्मांची स्थापना करून उडविण्याचा प्रकारही आहे तो पहा—" राम० बखर पृष्ठ १०१.

हीच चवदा ब्रह्मांची गोष्ट पंढरपुरांत कोणी ब्राह्मणांनीं समर्थांस विचारली. वामनपंडितांनीं नव्हे. तेव्हां स्वामींनीं अद्भुत चमत्कार दाखविण्यासाठीं कोणी मलयगंधर्व नारदाच्या शापामुळें मंढरींत अविंधाच्या जन्मास आला होता, त्याकडून ती सांगवून त्या अविंधाचा उद्धार केला, असें महीपति संतविजय अ० २१ त सांगतात. तेथें वामनपंडितांच्या नांवाचा उल्लेख मुळींच नाहीं!

असावें. असें झालें नसतें तर स्वामींनीं रुद्ररूप धारण करून क्रोधानें शेपटाचा तडाखा मारणें व कोप शमल्यानंतर 'तुझी पंडित सर्व ग्रंथांचें अवलोकन करीत असून बरोबर उंटाचेउंट पुस्तकें बाळगून जयपत्रें घेत आलां' इत्यादि मानभंगाचीं दुरुत्तरें बोलणें, या दोन गोष्टी समर्थांकडून झाल्या नसत्या. किंबहुना त्यांच्या बखरकारानें अशा प्रकारचे मत्सर-प्रदर्शक शब्द त्यांच्या तोंडांतून काढविले नसते. पदार्थास संज्ञार्थ ब्रह्म असें नांव दिलेलें, परंतु तो पदार्थ खरें ब्रह्म नव्हे. असे हे चवदा पदार्थ ब्रह्म या नांवानें मोडतात परंतु ते ब्रह्म नव्हत. अशी क्षुल्लक गोष्ट या महापंडितांस समजली नाहीं व तीं ब्रह्मेंच आहेत असा ते दुराग्रह धरून बसले, असें सांगणें हें निवळ भाविक जनांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्या-सारखें होय. वादांत ज्याचा पक्ष दुर्बल ठरत येतो त्या पक्षकारा-सच राग यावयाचा संभव असतो. यावरून समर्थांचा पक्ष दुर्बल होत आल्यामुळें त्यांना रुद्ररूप धारण करावें लागलें असें सिद्ध होतें. आणखी, हा चवदा ब्रह्मांचाच वाद घटकाभर खरा असें ह्मणून चाललों तरी समर्थांस साधुरीतीप्रमाणें आपणाकडे आलेल्या वामन पंडितांसारख्या विद्वानाचें जर दुरुत्तरांनीं गांजल्याशिवाय समाधान करावयाचें असतें तर जें त्यांहीं सरते शेवटीं 'हें बृहदारण्यकांत पहा' असें सांगितलें, तेंच प्रथमारंभीं पंडितांस सांगितलें असतें, ह्मणजे या सर्व संतापाचें मूळच जाऊन समर्थांकडे गौरव व साधुपणा विशेष आला नसता काय? कसेंही असो, या गोष्टीचा एकंदर झोक असा दिसतो कीं, कोणत्याही प्रकारें पंडितांच्या उपहासानें समर्थांचें महत्त्व वाढवायाचें एवढाच आहे. हें वामन पंडितांचा गीर्वाणभाषेंत अनुभूतिलेश या नांवांचा एक ग्रंथ आहे त्यांत जी कांहीं त्यांनीं आपली व आपल्या वेळच्या साधूंची थोडीशी हकीगत दिली आहे त्यावरून स्पष्ट दिसून येईल. पंडित असें ह्मणतात कीं,

---

१ गागाभट महापंडित ज्यांहीं शिवाजीला राज्याभिषेकाविषयीं शास्त्राधार देऊन त्याप्रमाणें राज्याभिषेकही केला, ह्यांची देखील समर्थांच्या महंतांसमर्थनार्थ यांनीं टर उडविण्यांत कमी केलें नाहीं. (संतवि० अ० १४ ओ० ५५-१३६ पहा.) यावरून या महासाधूंच्या अनुयायांचा पंडितजनांशीं स्वभावतः मत्सर-भाव दिसतो. याचें कारण त्यांच्या पांडित्यरूप सूर्यप्रभेपुढें या साधुजनांच्या सर्वज्ञतारूप अग्निप्रभेचा सहज लोप होई, तो त्यांना असह्य होत असे इतकेंच असावें.

"छांदोग्य उपनिषदाच्या वचनांवरून अद्वैततत्त्व जाणण्याची ज्या कालीं मला जिज्ञासा झाली, त्या कालीं पृथ्वीवरील विख्यात यति, वेदांतशास्त्र सांगणारे साधु, जे प्रत्यगात्मा जाणून सर्व जग ब्रह्मत्वानें जाणत नाहींत अशा पुष्कळांची मी गुरु करण्यासाठीं सेवा केली. संस्कृतशास्त्रज्ञ व प्राकृतग्रंथवित्तम अशा पुष्कळ साधूंस अद्वैततत्त्व सांगण्यासाठीं मीं सेविलें. संस्कृतग्रंथकर्त्यां भाष्यकारादिकांहीं जें ज्ञान सांगितलें आहे, तें देखील कोठेंच ऐकण्यांत आलें नाहीं. शंभर वर्षांमागें जे प्राकृतग्रंथकार होऊन गेले त्यांसारिखे ज्ञानी प्रस्तुत कोणी नाहीं. ह्या भूतलावर तत्त्वज्ञान जाणणारा कोणी मला मिळाला नाहीं. ह्मणून मीं निराश होऊन गंगायमुनेच्या संगमीं देहत्याग करण्याचा निश्चय केला. कारण ज्या धीरांनीं तेथें देहत्याग केला, त्यांना अन्य जन्मीं गुरुमुखापासून ज्ञानप्राप्ति होऊन मुक्ति मिळाली आहे. 'नान्यः पंथा' या श्रुतीवरून ज्ञानानेंच मोक्षप्राप्ति, किंवा प्रयागीं देहत्याग केल्यानें अन्य जन्मांत ज्ञानप्राप्ति होऊन मुक्ति मिळायाची, असा निर्णय आहे. असा निश्चय करून मी मलयाद्रिदेशीं फिरत असतां, श्रीविष्णूनें यतिरूपानें प्रगट होऊन मला तत्त्वोपदेश केला."

'या भूतलावर तत्त्वज्ञान जाणणारा कोणी मला मिळाला नाहीं.' एव

---

१ अनुभूतिलेश नामक पंडितांच्या संस्कृत ग्रंथाची समश्लोकी टीका साम्राज वामनानें केली ती मूळासहित वामनी ग्रंथ भाग ४ पृष्ठ २६१ वर छापिली आहे, तींतील ह्या पुढील पद्यांचें हें भाषांतरः—

वेदांतशास्त्रवक्तारे यती जे प्रत्यगात्मता । जाणूनीही सर्व जग ब्रह्मत्वेंच न जाणती ॥ १३४ ॥ गुरुत्वाकारणें म्यां या भूतळीं बहु सेविले । आत्मोपदेशसमर्थी आचार्यत्वें न मानिले ॥ १३५ ॥ ऐशी छांदोग्यवचनें जिज्ञासा ऊठली जयीं । तत्त्वज्ञ जे क्षितितळीं विख्यात सेविले तयीं ॥ १३८ ॥ एवं संस्कृतशास्त्रज्ञ प्राकृतग्रंथवित्तम । अद्वैततत्त्व बोलाया सेविले म्यां बहुत ते ॥ १४० ॥ संस्कृतग्रंथकर्ते जे भाष्यकारादि पूर्थिवत । जें ज्ञान बोलिले तेंही कोठेंच नाहिं देखिलें ॥ १४१ ॥ वर्षशताचिया पूर्वीं प्राकृतग्रंथाकर जे । त्यक्तदेही जे यथोक्त न तैसे ज्ञानि प्रस्तुतीं ॥ १४२ ॥ होतां निराश ज्ञानातें नच भूताळीं जाणता । संगमीं सित असित सिद्धांत तनु त्यागणें ॥ १४३ ॥ त्यागिली तेथ तनु ज्या धीरांनीं अन्य जन्मि ते । कोठें गुरुमुखें ज्ञान लाभुनी मुक्ति पावले ॥ १४४ ॥ "नान्यः पंथा" श्रुतीनें या ज्ञानेंच मोक्षनिर्णय । मुक्ति जन्मांतरीं ज्ञानें तनुत्यागें प्रयागिंही १४५ ऐशा स्वबुद्धि कृतनिश्चयानें, माल्याद्रिदेशीं फिरतां तनूनें । श्रीशेषशायी यतिवर्यरूपें, झालाच प्रत्यक्ष गुरुस्वरूपें ॥ १४६ ॥

ढेंच या पंडितांच्या मत्सरयुक्त छलास उत्तर बस आहे; अधिक लिहिण्याचें कारण नाहीं. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत तत्त्वज्ञासाठीं देशपर्यटण करून यांनीं सर्व तीर्थें व देवस्थानें पाहिलीं असें स्पष्ट होतें. रामेश्वराकडून परत येतांना मार्गांत मलयाचळीं ह्मणजे मलबार प्रांतांतील चंदनवनांत यांनीं मुकाम केला. जोंपर्यंत अद्वैततत्त्वाचा पूर्णानुभव पंडितांस आला नव्हता तोंपर्यंत त्यांनीं मध्वमतानुसार पत्नीच्या हातच्या अन्नास स्पर्श केला नाहीं असें वाटतें. कारण कीं, त्यांसमागमें त्यांची पत्नी असतांही येथें ते स्वयंपाकाच्या खटाटोपांत गुंतले असून अंतर्यामीं आनंदपदाच्या अनुभवविचारांत निमग्न होते. अशा समयीं पंडितांच्या कानांत एकाएकीं हास्यध्वनि पडला. पंडितांनीं कोण आहे ह्मणून मागें वळून पाहिलें तेव्हां त्यांस भगवें वस्त्र दिसलें. मुखाकडे पहातात तर त्यांस शेंडी नाहीं. त्यांना पाहून पंडितांचें चित्त वेधून गेलें. इतक्यांत 'तुमच्या मनांत काय घोळतें?' असा त्या संन्याशानीं पंडितांस प्रश्न केला. त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून पंडितांनीं आपल्या मनांत घोळत होते ते विचार त्यांस निवेदन केले. तेव्हां त्या सच्चिदानंदमूर्तीनें कृपाविष्ट होऊन सर्व उपनिषदांचें सार दोन मुहूर्त्तांत वामन पंडितांस उपदेशिलें व मस्तकावर हात ठेवून आपल्यासारिखें सच्चिदानंदरूप करून सोडिलें.

---

१. वामनी ग्रंथ भाग ४ था पृष्ठ १-२ निगमसार ओ० १०, १७, १९ अ० १.

२. या हास्यध्वनीविषयीं रामदासांचे बखरकार असें लिहितात कीं, वामनपंडित मध्वसंप्रदायी असल्यामुळें पत्नीचे हातचें जेवीत नसत; परंतु तिनें स्वयंपाकाची सिद्धता करून भांडीं चुलीवर चढवावीं व पंडितांनीं तीं उतरून घेऊन मग भोजन करावें. एक दिवस वाटेंत पाक करतेवेळीं सच्चिदानंदब्रह्मलक्षणाचा विचार करीत असतां पंडितांस समाधी लागली. इकडे पात्र अग्नीवरून घसरलें. त्यामुळें गिराबाई हंसली. पंडितांच्या हें कानांत पडतांच कां हंसलीस ह्मणून त्यांनीं विचारलें. ती ह्मणाली—'तीन वेदांचा अद्यापि विचार करीत आहां ह्मणून हंसलें.' तेव्हां पंडितांनीं ह्मटलें कीं, 'दुसरा कोणी असता तर वंदनादि व्यवहार केला असता इ०' हें वर्त्तमान अंतर्ज्ञानानें समर्थांस समजलें व पुढें भेटीअंतीं समर्थांनीं पंडितांची थट्टा केली!

निगमसार ग्रंथांत पंडितांनीं दिलेल्या हकीकतीचें हें यतीच्या ठिकाणीं गिराबाईचें नांव घालून रूपांतर केलें आहे, असें कोणीही सांगूं शकेल. मर्मज्ञच हवा असें नाहीं. यावरून ब्रह्मराक्षसाची गोष्ट आह्मी सांगितल्याप्रमाणेंच असावी किंवा नाहीं याचा सुज्ञांनीं विचार करावा.

या उपदेशानंतर पंडितांची वृत्ति कशी झाली तिचें त्यांनीं थोडक्यांत अपूर्व रीतीनें वर्णन केलें आहे; तें असें:–

क्षणामाजी सचराचर। मज वाटलें माझें शरीर।
आकार तितुकें निराकार। तेंचि समयीं ॥ ४० ॥
जैसा उगवतां दिनकर। कांहींच नुरे अंधार।
उपदेशाचा वडिवार। ऐसा देखिला ॥ ४१ ॥

निगमसार अ० १.

वामनपंडित जरी निःसीम व प्रेमळ हरिभक्त होते तरी त्यांची साधूंत गणना झाली नाहीं. याचीं कारणें दोन. ते ढोंगी नव्हते त्यामुळें त्यांकडून अद्भुत चमत्कार झाले नाहींत, हें एक; व श्रीमद्भगवद्वचन, जें गीताशास्त्र, त्याची यथार्थ टीका करितांना जेथें जेथें अन्य संस्कृत किंवा महाराष्ट्र टीकाकारांपासून एखाद्या पदाचा अर्थच झाला नाहीं, किंवा कोठें कोठें विपरीतार्थ झाला आहे, तेथें तेथें पंडितांनीं त्यांना गीता समजली नाहीं असें निर्भीडपणें ह्मटलें, हें दुसरें.

प्राकृतांत यावेळीं दोन टीका होत्या. एक भावार्थदीपिका किंवा ज्ञानेश्वरी व दुसरी चित्सदानंदलहरी. पहिलीचे कर्ते जगविख्यात ज्ञानेश्वर व दुसरीचे रंगनाथस्वामी. पंडितांनीं जें काहीं संस्कृत व प्राकृतटीकाकारांस अनुलक्षुन ह्मटलें तें सर्वच प्राकृतटीकाकारांच्या भक्तांनीं त्यांकडेसच लागू केलें. ज्ञानेश्वरास लोक ईश्वरावतार मानीत असत व हल्लींही मानितात. त्यांना अर्थ समजला नाहीं असें ह्मणणें ह्मणजे ईश्वरासच गीतेचा अर्थ समजला नाहीं असें ह्मटल्यासारिखें झालें. हा पंडितांचा लहानसहान अपराध नव्हे. ज्ञानेश्वरानें भिंत चालवून रेड्याच्या मुखानें वेद बोलविले. रंगनाथस्वामींनींही असेच कांहीं अद्भुत चमत्कार केले. परंतु पंडितांच्या अंगीं लहानसा पाषाण देखील उचलायाची शक्ति नसून त्या अवतारी पुरुषांच्या अर्थास दोष लावणें हें कोणास सहन होणार होतें बरें? या महदपराधाचें शासन पंडितांस मिळालें! त्या टीकांच्या भक्तांनीं यांचें साधुत्व हिसकून घेऊन, होईल तितका छल केला व संताळयाच्या प्रदेशांतून यांच्या टीकेस हाकून लाविलें. परंतु साधु ते साधूच! ज्यांहीं विश्वात्मयोगाच्या

१ ही टीका शके १५१० त झाली. ह्मणजे वामन पंडितांच्या जन्मापूर्वीं १० वर्षें. पंडित प्राकृत टीकांविषयीं बोलतांना बहुवचनीं बोलतात तेव्हां हीही टीका त्यांच्या पहाण्यांत आलीच असावी.

सिद्धीसाठीं भरतखंडभर प्रवास केला, ज्यांचें सर्वत्र सम पाहाणें क्षणभर टळलें नाहीं, विश्वकल्याण हेंच ज्या सत्पुरुषाचें महाव्रत, त्याला असला साधुपणा मिरवायाची आवड कोठून असायाची ? यथार्थ गीतार्थ सांगून जगाचा मुक्तिमार्ग सुलभ करून द्यावा एवढाच त्यांचा हेतु. तथापि इतर टीकाकारांचे अभिमानी आपली व आपल्या टीकेची अवहेलना करितील असें त्यांना समजलें नव्हतें असें नाहीं. ते त्याविषयीं असें ह्मणतातः—

वाचोत जे वाचिती । न वाचोत जे वाईट मानिती ।
संतुष्ट होय एक जगत्पती । या यथार्थ निरूपणें ॥११८०॥
यथार्थदी० अ० ७.

ज्यांस इतर टीकाकारांचे अभिमान । ते न देतील या टीकेस मान ।
हरिभक्त निर्मत्सर निरभिमान । तेचि देतील सन्मान या टीकेतें॥ ११२८॥
यथार्थदी० अ० ८.

यथार्थदीपिकेंत श्रुतिस्मृति पुराणांतून तशींच भागवत भारतांतून प्रमाणें देऊन शास्त्रिय रीतीनें जें विषयप्रतिपादन केलें आहे त्यावरून हे महा-पंडित होते व यांचें ग्रंथावलोकन फारच होतें, याविषयीं मुळींच संशय रहात नाहीं. भगवद्गीतेच्या नवमाध्यायांतील दुसऱ्या श्लोकांत ' प्रत्यक्षाव-गमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ' द्वादशाध्यायांतील शेवटल्या श्लोकांत 'ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते,' अष्टादशाध्यायांतील सत्तराव्या श्लोकांत 'अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः' या स्थलीं गीताकारानें ' धर्म्य ' पदाची जी योजना केली आहे तिचा स्पष्टार्थ कोणींच केला नाहीं तो सांगावा इत्यादि यथार्थदीपिका करण्याचा हेतु सांगतांना पंडित ह्मणतात कीं:—

भवद्रुमातें छेदी शस्त्र । ऐसें तुझें गीताशास्त्र ।
त्याची दाविती पाठमात्र । धार लपविती ये रीती ॥११०॥
खड्गास मुख्य पाणी । तैशी भक्तिपर तुझी वाणी ।
गीतेच्या अंतीं चक्रपाणी । ऐसेंचि बोलिलासी ॥१११॥
कोण्या मिसें तरी कोणी । गीतार्थ अन्यथा वाखाणी ।
मज नावडे ती थोरांचीही वाणी । काय करूं जी श्रीकृष्णा ११६
संसारछेदक सार । गीताशास्त्राची भक्ति धार ।
ते झांकूनि नुसतें निराकार । मात्र दाविती ॥ ११७ ॥
यथार्थदी० अ० १

---

१ निबंधमाला भाग २ पृष्ठ १३१.

हें त्यांचें ह्मणणें वेदांतधर्मपुरश्चरणकर्ते प्रख्यात गीताभाष्यकार जगद्गुरु शंकराचार्य यांपासून तहत महाराष्ट्रटीकाकार रंगनाथस्वामी यांपर्यंत लागू आहे. या एका धर्म्यपदाच्या जोरावर गीतार्थांत सगुणभक्तीचें वर्चस्व स्थापून गीतावचनांची एकवाक्यता करतांना पंडितांनीं पांडित्याची जी शिकस्त केली आहे तशी महाराष्ट्र ग्रंथांत कोठें सांपडणार नाहीं.

पंडितजनांस गीर्वाणभाषेशिवाय इतर भाषा तुच्छ, असें असतां वामन पंडितांनीं यथार्थदीपिकादि जे ग्रंथ महाराष्ट्र भाषेंतच केले ते केवळ लोकसंग्रहार्थच केले, इतकेंच नव्हे, तर गीर्वाण भाषेचा तसाच आपल्या पांडित्याचा यत्किंचित् गर्व त्यांना नव्हता. जें आत्मज्ञान संपादन करण्यासाठीं त्यांहीं अश्रांत श्रम केले व देहत्यागाचाही निश्चय केला, तें महाराष्ट्र जनांस अल्पायासानें प्राप्त करून द्यावें, एतदर्थ पारिभाषिक शब्दांचाही अर्थ यथार्थदीपिकेंत जेथल्या तेथें देऊन, अपक्क महाराष्ट्र भाषेस पक्वदशेस आणून, अत्यंत कठीण शास्त्रीय विषय साधे सोपे व सरळ मराठींत सांगितला. याहून साधूंचें सदयहृदय तें कोणत्या प्रकारचें असावयाचें? स्वतः ते याविषयीं असें ह्मणतातः—

जी जी देवाधिदेवा । प्राकृत भाषें करितां तुझी सेवा ।
वेदवाणीस उपजे हेवा । तुझ्या स्वरूपाचा ठेवा जीमाजी ॥१०॥
मुख्य तुझें नाम गोड । पुरवी सर्वां भाषांचें कोड ।
तें कानीं मुखीं येतां मोड । देहीं उपजती प्रेमाचे ॥ ११ ॥
काय वेदशास्त्र जाणे व्रज ? । ज्याची भक्ति देखोनि तुझा आत्मज ।
ब्रह्मा वेदवक्ता शिरीं पदरज । वंदी व्रजनारीनरांचे ॥ १२ ॥
गजेंद्र कोण शास्त्र पढला । बाळ कोणा पांडित्यें ध्रुवपदा चढला ।
दासी कुब्जा तिला घडला । काय अभ्यास संस्कृताचा? ॥ १३ ॥
व्रजीं चारितां गायीं । कुचकुंकुमें गोपिकांचीं पायीं ।
तदंकित तृणें कृतार्थ ठायींठायीं । वल्लवस्त्रिया पढलिया त्या काय १४
अभिमानें बुडाले पंडित । यज्ञपत्न्यांनीं अर्चितां वैकुंठमंडित ।
न पढतां न वाचितां अखंडित । आनंद भक्तीनें पावल्या ॥ १५ ॥
भक्ति थोर भक्ति थोर । तूं चंद्रमा भक्त तुझे चकोर ।
तूं मेघ भक्त मयूर । मेघश्याम समोर त्यांस तूं सर्वत्रही ॥ १६॥
एवं पावावया तुझे चरण । भाषा कोणी नव्हे कारण ।
कारण सप्रेम अंतःकरण । देवाधिदेवा ॥ ११७ ॥

जैसें भजनास कारण नव्हे वित्त । मुख्य सादर असावें चित्त ।
तथापि वित्तवंत वेंचिती यानिमित्त । कीं अन्यथा वित्तशाठ्य लागेल ॥१८॥
मंगलाचरण ह्मणोनी । करितों देवा संस्कृतें करोनी ।
कोणी अर्थी दृष्टीही नेदुनी । सुखें उगेंच ही वाचीत ॥ १९ ॥
जेथोनि टीकेचा आरंभ । तेथोनि गीतार्थ जो स्वयंभ ।
तो होय अत्यंत सुलभ । शब्द ऐसे योजितों ॥ २० ॥

यथार्थदी० अ० ९.

अक्षरगणवृत्तांत कविता करणाऱ्या महाराष्ट्र कवींत वामनपंडित हे आद्यकवि. भीष्मप्रतिज्ञा हें त्यांचें प्रथम काव्य असावें. कारण यांतील मंगलाचरणपद्यांत त्यांहीं मातापित्यांस वंदन करून शेवटील पद्यांत त्यांचीं नांवें, गोत्र, कुलदेवाचें नांव इत्यादि सांगितलें आहे. असें त्यांनीं आणखी कोणत्याच काव्यप्रकरणांत केलें नाहीं. त्यांनीं ग्रंथारंभीं सगुण ब्रह्म जो विष्णु त्याचें अथवा त्याच्या रामकृष्णाद्यवतारांचें मंगलाचरण केलें आहे. अन्य महाराष्ट्र कवींसारिखें विघ्ननाशनादि दैवतांचें मुळींच केलें नाहीं. त्यांविषयीं त्यांचें ह्मणणें असें आहेः—

जे मंगलाचरणीं । लागती इतरदेवतांचे चरणीं ।
त्यांस भगवंताचे जगद्वंद्यचरणीं । कैंचें अनन्यभक्तित्व ? ॥३६१॥
द्वाराचि ज्याचें न सांपडे । त्या गृहांतील निधि केंवि ठायीं पडे ? ।
या ज्ञानाचें कवाड उघडे । अनन्य चरणशरणातें ॥ ३६२ ॥

यथार्थदीपिका अ० ९.

मंगलाचरणानंतर जो कांहीं विषय किंवा कथाभाग सांगायाचा त्याचें तत्त्व एक दोन पद्यांत वाचकांस सादर करावयाचा पंडितांचा प्रघात असे, तो असाः-

ठेवुनि नंदसदनांत हरी स्वहातें, माया व्रजेशतनया तिस ने गृहातें ।
आणी अजा त्यजुनि अन्यगृहीं अजाला, तो बद्ध मागुति पहा वसुदेव झाला ॥

कृष्णजन्म.

भक्तांनिमित्तचि अघासहि मोक्ष झाला, भक्तांस देउनिहि मोक्ष अधोक्षजाला ।
वाटे असेंच मजला ऋण त्या जनांचें, भक्तप्रियत्व इतुकें भवभंजनाचें ॥

वनसुधा.

---

१. निबंधमाला भाग २, पृष्ठ ९२२. हंसकृत वामनचारित्र पृष्ठ ५. रामदासांची बखर पृष्ठ ३०४. रामदासस्वामीचें मत असें नसतें तर त्यांनीं ' दमन्या वामन ' असें लाडकें नांव पंडितांस दिलें नसतें.

स्वउदरांत चराचर मृत्तिका, पसरुनी मुख दावित कौतुका ।
प्रकट जो करि बाल्यकथारसा, नमिन त्या हरिच्या पदसारसा ॥

मृत्तिकाभक्षण.

सलज्जांची लज्जा हरि परिहरी आशुभजनीं
असें गोपीवस्त्रें हरुनि विभु दावी शुभ जनीं ।
स्वभक्ता नारीही नर न भजती त्याहुनि वरा
द्विजस्त्रीप्रेमें हें स्फुट करि नमो त्या यदुविरा ॥

कात्यायनीव्रत.

'सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।
ओंवी मुक्तेशाची, आर्या गात्री मयूरपंताची ॥ '

हें ज्या कोणी काव्यमर्मज्ञानें ह्मटलें तें अक्षरशः खरें आहे. पंडितांच्या कालापासून आजपर्यंत अक्षरगणवृत्तांत अनेक कवींनीं अनेक कथानकें लिहिलीं, परंतु त्यांतून एकही यांच्या काव्यरचनेशीं तुलना करणारें अझून झालें नाहीं. जशीं गोपिकांचीं मनें वेणुनादानें अत्यंत मोहित झालीं, तशींच वामनाच्या काव्यसूक्तींनें जनमनें भुलून गेलीं; इतकेंच नव्हे, तर आद्यकवि जो वाल्मीकि त्याचेंही मन भुलून त्यानें मस्तक डोलविलाच कीं काय असें मोरोपंत ह्मणतात. ह्या प्रकारचा सन्मान पंतांनीं कोणत्याच महाराष्ट्रकवीस दिला नाहीं.

वाटे सूक्तिश्रवणें मस्तक वाल्मीकिनेंहि डोलविला ।
प्रभुनें भुलवाया मन वामन हा वेणुसाचि वोलविला ॥

वामनपंडितस्तुति.

पंडितांची वाणी मधुर व प्रसादयुक्त; महाराष्ट्र भाषेवर यांची पूर्ण सत्ता; अर्थालंकार, शब्दालंकार, प्रास, यमक इत्यादि काव्यगुणांनीं मंडित यांची कविता; देश काल व स्थिति यांस योग्य त्या विचारानें संस्कृतशब्दांचें अधिक मिश्रण

१. मोरोपंतांच्या चरित्रलेखकांनीं भाषास्वामित्व पंतांकडे दिलें आहे. आह्मींही तें नाकबूल करण्यास खुशी नाहीं, परंतु तत्त्वज्ञानासारिखा कठीण शास्त्रीय विषय अक्षरगणवृत्तांत अस्खलित व आनंददायक रीतीनें प्रतिपादन करितांना वामन पंडितांनीं संस्कृत भाषेचें कितीसें साह्य घेतलें आहे व त्यांच्या मागून पंत ११० वर्षांनीं ह्याच रंगभूमीवर आले, त्यांनीं भारत, रामायणादि ग्रंथांतील कथानकें सांगतांना गीर्वाण भाषेचें किती साह्य घेतलें आहे, याचें जर अनुमान काढिलें तर महाराष्ट्रभाषास्वामित्व पंडितांकडेच आलें पाहिजे, असें निर्मत्सर लेखक कबूल करितील, असें आह्मांस वाटतें.

न करितां, आपण काय सांगतों हें सर्वांस समजावें अशा रसभरित सुगम मराठींत रचिली. तींतील प्रत्येक पद्यावर जसा काय यांचा ठसाच उमटला आहे; यामुळें तींत जें पुढें कमजास्त झालें तें लेखकप्रमादानें किंवा लेखकपांडित्यानें झालें असें स्पष्ट दिसतें; इतकेंच नव्हे, तर कोठें कोठें मागाहून जीं नवीन पद्यें मध्येंच घुसडिलीं आहेत तींहि बिनचूक ओळखितां येतात.

पंडितांचा मुख्य विषय म्हटला म्हणजे अध्यात्म; हा लोकांच्या अनावडीचा. परंतु श्रीमद्भागवतावर यांचें फार प्रेम असल्यामुळें सगुणभक्तिरूप अलंकारानें तो इतका विभूषित झाला आहे कीं, त्यांत वाचकांचीं मनें प्रेमानंदानें तन्मय होऊन जातात.

नामसुधा, चित्सुधा, प्रियसुधा, गीतार्णवसुधा, चरमगुरुमंजरी, विश्वासबंध, राजयोग, उपादान, निगमसार, ब्रह्मस्तुति, कर्मतत्त्व, तत्त्वमाला, समश्लोकी गीता, यथार्थदीपिका इत्यादि यांच्या तत्त्वज्ञानग्रंथांत तर निरस स्थलें मुळींच मिळावयाचीं नाहींत. या ग्रंथांत विषयप्रतिपादनरूप नदीचा प्रवाह इतका अव्याहत चालला आहे कीं, त्यांत वाचकांचें मन निमग्न होऊन गहनविचाररूप रत्नांच्या शोधार्थ तें गटकळ्या देत आनंदानें त्या ओघासरसें पोहत जात आहे असेंच अनुभवास येतें. वाचकांस मात्र या शास्त्रीय विषयाचें थोडें बहुत ज्ञान असलें पाहिजे. मासल्यासाठीं नामसुधेंतील लहानसा एक चुटका येथें देतों:-

---

१. निबंधमाला भाग २ पृष्ठ ९४६. हंसकृतवामनचरित्र पृष्ठ ६८.

२. हंस आपल्या वामनचरित्रांत पंडितांच्या काव्यांतील च्युतसंस्कृति अथवा संस्कारहीनत्वादि दोष दाखवितांना "श्रवण कीर्त्तन माधव वंदनें, जळति पूर्विल पापहि काननें।' या पद्यांतील 'पापहि काननें' या शब्दांवर बरीच टीका करून मग म्हणतात कीं, 'पापहि काननें' या ठिकाणीं 'पातककाननें' असा शब्द घातला असता तर च्युतसंस्कृतीचा दोष झाला नसता. अथवा 'पातककाननें' असाच मूळचा पाठ असून लेखकप्रमादानें त्या ठिकाणीं 'पापहि काननें' झालें असेल असेंही संभवतें." हंसांस हा लेखकप्रमाद असावा असा संशय तर आला खरा; परंतु वामनपंडितांकडून अशी चूक व्हावयाचा संभव नाहीं, असें मात्र वाटलें नाहीं, हें नवल! आह्मांकडेस नामसुधेच्या सहा प्रती आल्या. त्यांतून एकेंहि प्रतींत वरील प्रमाद आह्मांस आढळला नाहीं. तथापि लेखकप्रमादानें किंवा त्यांच्या पांडित्यानें यांच्या कित्येक प्रकरणांत असा कांहीं चमत्कार झाला आहे कीं, कांहीं पद्यांचा अर्थ मुळींच लागत नाहीं.

विज्ञान जें अतिरहस्य विशुद्ध वेदीं, तेथेंचि भागवतधर्म न भक्ति भेदीं ।
ज्याकारणें प्रिय कलत्र सुतादिवित्तें, तेव्हांचि भक्ति जरि तो उमजेल चित्तें ॥१६॥
म्हणविती बहु वैष्णव आपणा, परि न जाणति भक्तिचिया खुणा ।
हरि असें दुसरें जरि नावडे, तरिच ते हरिभक्ति तयां घडे ॥ १७ ॥
प्रिय हरी सकळांहुनि जाणती, परि जयास्तव तो प्रिय नेणती ।
भजति कीं सुख दे हरि आपणा, प्रिय तयीं निजजीव हरी उणा ॥१८॥
निजसुखार्थ धनादि जसीं प्रियें, प्रिय हरी स्वसुखार्थचि निश्चयें ।
धनसुतांहुनि आवडि आपुली, तसि हरीहुनि भक्ति न हे भली ॥१९॥
भजति मुक्तिनिमित्त हरी जरी, निजनिमित्त तदर्थ नव्हे तरी ।
भजति मानधनार्थ नृपा जसे, हरिस मुक्तिनिमित्तक हे तसे ॥ २० ॥
जरि न मुक्तिनिमित्तहि सेविती, तरि किमर्थ उपास्य रमापती ।
जगिं वृथाचि न मंदहि वर्तती, वदति शास्त्रविशारद ये रिती ॥ २१ ॥
प्रयोजनावांचुनि मूर्ख तेही, प्रवर्तती न त्रिजगांत देही ।
शास्त्रज्ञ होऊनि वृथा हरीला, कां सेवितां हें समजोनि बोला ॥ २२ ॥
म्हणाल आतां गुण गोड भारी, याकारणें आवडतो मुरारी ।
सुधा बहू गोड सुरेंद्रलोकीं, ऐकोनि तीवें न भजाचि कां कीं ॥ २३ ॥
स्वभक्ता न जाणे सुधा आणि कांहीं, कृपाळू हरीसारिखी होत नाहीं ।
असें बोलती जे तयांला पुसावें, कृपा घेउनी काय सांगा करावें ॥२४॥
कोण्या प्रकारें निजदुःख नाशी, नासूनि दुःखा करि सौख्यराशी ।
याकारणें तो प्रिय देव जेव्हां, स्वप्रीति देवाहुनि थोर तेव्हां ॥ २५ ॥
निजसुखार्थ हरी प्रिय जेधवां, अधिक आपुलि आवडि तेधवां ।
हरिहुनी प्रिय आणिक ही असी, निगमसंमत भक्ति घडे कसी ॥ २६ ॥
मैत्रेयीप्रति याज्ञवल्क्य निगमीं विस्तार हा बोलिला
कीं ज्यालागिं समस्त ही प्रिय असा आत्माच हा आपला ।
जो कां आवडतो निमित्त नसतां तो जाणसी जेधवां
कांहीं ही तुज जाणणेंचि न उरे सर्वज्ञ तूं तेधवां ॥ २७ ॥
जें जें लौकिक सौख्य वैदिकहि जें ज्या आपणा कारणें
वाटे आवडतें तसा प्रियतम स्वात्माचि जो आपणें ।
ज्याची आवडि निर्निमित्त हरिही ज्याकारणें आवडे
तोचि श्रीहरिसा कळे तरिच हे सद्भक्ति ठायीं पडे ॥ २८ ॥

नामसुधा अ० ३, चरण २.

काव्यांत नऊ रसांची योजना केलेली असते, परंतु पंडितांनीं शुकाचार्यांच्या आधारावर आणखी एक भक्तिरस त्यांत वाढवून, त्यांचीं उदाहरणें नवरसमाला किंवा कंसवध या प्रकरणांत दिलीं आहेत. त्यांतील हे दोन श्लोक; यांत कंसवधसमयीं श्रीकृष्ण भगवान् कसा दिसला तें वर्णिलें आहे:—

मल्लां वज्र गमे नरां नृप गमे काम स्वयें स्त्रीजनां
गौळ्यां आप्त नृपां खळां प्रभु शिशू मातापित्यांच्या मना ।
कंसा मृत्यु अशक्त पामरजना संतांसि तत्त्वामृत
श्रीशेषासन यादवां हरि दिसे रंगांत रामान्वित ।। ४ ।।
दे मल्लां रस रौद्र अद्भुत नरां शृंगार नारीजनां
गौळ्यां हास्य नृपांस वीर करुणा मातापित्यांच्या मना ।
कंसालागिं भयानकाख्य रस दे बीभत्स मूढां भ्रमें
संतां शांतरस स्वभक्तिरस तो दे यादवां या क्रमें ।। ५ ।।

सीतास्वयंवरांतही पंडितांनीं या दश रसांचीं उदाहरणें दिलीं आहेत:—

सुस नवहि रसांची रामरूपेंचि केली
तरि दशम रसाच्या आवडीनें भुकेली ।
दशम सुरस ओते त्यांत रूपें नवांचीं
दिसति सफल विद्या तेधवां मानवांची ।। ५७ ।।

हें पंडितांचें संक्षिप्त चरित्र असल्यामुळें सर्वरसप्रदर्शक वर्णनांचे उतारे देण्याची यांत सवड नाहीं. तथापि ज्यांना शृंगाररसोत्कर्ष पहावयाचा असेल त्यांनीं तो रासक्रीडा, रासमंडळ, भामाविलास, राधाविलास, कात्यायनीव्रत व राधाभुजंग या प्रकरणांत पहावा; हास्यरस वनसुधा, वेणुसुधा, कालियमर्दन, बालक्रीडा, द्वारकाविजय व सीतास्वयंवर यांत पहावा; वीररसप्रधान काव्य करण्याचा पंडितांचा हेतू जरी नव्हता तरी तो साधारण रीत्या भीष्मप्रतिज्ञेंत, भागवतरामायणांत व सीतास्वयंवरांत व्यक्त झाला आहे; रौद्र व भयानक हे नृहरिदर्पण, कालियमर्दन, सीतास्वयंवर व भरतभाव या प्रकरणांत स्पष्ट झाले आहेत; बीभत्सरसांत लिहायाचें पंडितांस कांहीं कारण जरी नव्हतें तरी तो अंशतः राधाभुजंगांत व भरतभावांत दृष्टिगोचर होतो; अद्भुतरस वामनचरित्र, अहल्योद्धार व सीतास्वयंवर या प्रकरणांत दिसतो; करुण, शांत, वात्सल्य अथवा भक्ति हे रस

तर यांच्या सर्वच काव्यांत मूर्तिमंत उभे आहेत. मासल्यासाठीं एक दोन लहानशीं वर्णनें देतों:—

स्वकृत बाल्यचरित्रमहोदधी, स्मरत गात सुखें मथि हो दधीं ।
रुचल भक्तिच कीं जननीच ते, समजती न कधीं जन नीच ते ॥ ४ ॥
पृथु नितंब नितंबिनिचा वरी, कटितटीं कटिसूत्रचि सांवरी ।
कनककंकणवृंदहि वाजती, मुखि सुखश्रमबिंदु विराजती ॥ ५ ॥
श्रवणिंचे श्रवणीं नग हालती, गळति गुंफिलिया शिरिं मालती ।
घुसळितां कुचकुंभहि कांपती, अमृत ज्यांतिल घे कमळापती ॥ ६ ॥
फिरविते रवितें दधिभीतरीं, मिरविते रवितेज नगांवरी ।
स्वकरिं ते करि चंचलता मनीं, उपरमे परमेश्वरगायनीं ॥ ७ ॥
मथी पुत्रभावें असी गायमाय, स्तनीं प्रेमपान्हा तिच्या काय माय ।
अशामाजि ये सर्वसंसारसाक्षी, असे जे स्थळीं गोपिका सारसाक्षी ॥९॥
फुटे प्रेमपान्हा भिजे आंत चोळी, हरी हानि मानूनिया हात चोळी ।
धरी भक्तिनें अर्पिल्याची स्पृहा हा, ह्मणोनी ह्मणे व्यर्थ जातें अहाहा ॥१०
जननिच्या स्तनदुग्धरसार्पणें, स्वसुखतृप्तिहि मानिचि तर्पणें ।
ह्मणे असा रस जाय गळोनिया, ह्मणुनि ये हरि हेंचि कळोनिया ॥१२॥
क्षुधित मी स्तन दे मज लौकरी, ह्मणुनिया रवि गाढ धरी करीं ।
त्वरित बैसुनि दे स्तन नागरी, मन जिचें बुडतें सुखसागरीं ॥ १३ ॥

मुखसुखामृतरश्मि पहातसे, तुह्मि हि कां स्वमनीं न पहा तसे ।
परि तयासहि टाकुनि धांवते, तुह्मि हि ध्याल ह्मणी अजि धांव ते ॥१४॥
त्रिभुवनात्मक राज्यहि ये करा, त्यजुनि तें हरिभक्तिचि हे करा ।
जरि बुडोनि समस्तहि जातसे, तरि बुडो, हरि तोचि भजा तसे ॥ १५ ॥

प्रभूस नेणोनिच पुत्रभावें, ते गौळणी स्त्रीप्रकृतिस्वभावें ।
लोटोनियां चक्रगदायुधातें, धांवे उते दुग्ध तया दुधातें ॥ १६ ॥
तो प्रेमपान्हा अवघाचि मातें, न पाजिला कां पुरुषोत्तमातें ।
ह्मणोनि कोपास चढे हरी तो, जो क्रोधकामा स्मरणें हरी तो ॥ १७ ॥

चावोनि ओंठ दशनीं मधुकैटभारी, फोडी शिळेंकरुनि तें दधिपात्र भारी ।
शिंकाघरांत हरि घालुनि पाणि खातो, दे मर्कटांसि नवनीत न आणिकां तो १८
मी घें स्वभक्तिरस कीर्तनिं वो रसाचा, टाकूनि त्या मज इला निजगोरसाचा ।
लोण्या दह्यांस हरि जो न कधीं भुकेला, कां फार लोभ ह्मणऊनिच नाश केला १९
तें दुग्ध नीट करितां क्षण एक झाला, तों आटवी जननि त्या क्षुधिता अजाला ।

ये थान देइन ह्मणूनि मनीं कृपा हे,देखे न त्यासि परि तत्कृतमात्र पाहे!३१
हांसे परंतु बहु गोरसनाश झाला, मारीन यास्तव मनींच ह्मणे अजाला ।
काठी धरूनि अवलोकन जों करीते,देखे घरांत मग ये अति लौकरी ते ३२
तों काष्ठऊलूखलपृष्टभागीं, उभा दुजे मर्कटही त्रिभागी ।
चोरूनि खातो नवनीत पाणी, घालूनि सिंका प्रभु चक्रपाणी ॥ ३३ ॥
उडी टाकुनीयां पळाला हरी तो, समस्तां भयालागिंही जो हरीतो ।
न तो सांपडे कीं जया काम नाहीं, न ठायीं पडे त्यांचिया त्या मनाही ३४
श्रमें श्रांत तीचा बहु देह झाला, बहू धांवतां ये कृपा त्या अजाला ।
जसी हस्तिनी बालहस्तीसि हस्तीं, यशोदा धरी कृष्णहस्त स्वहस्तीं ॥३५॥
कृतापराधें प्रभु रोदनातें, करी धरी त्या मधुसूदनातें ।
करें उगारी वरि वेत्र भारी, कांपे भयें देखुनि कैटभारी ॥ ३६ ॥
अहो लोचनीं पूर वाहे जळाचा, मुखीं माखला रंग तो काजळाचा ।
मुखाऊपरी नाचवी आड पाणी, भयें ताडणाच्या प्रभू चक्रपाणी ॥ ३७ ॥
नीलपंकजतनू सुकुमारा, देखतां अजि अशा स्वकुमारा ।
वेत्र दाखवि जरी घननीळा, हाणवे न तरि त्या जननीला ॥ ३८ ॥
संत्रस्त तो देखियला मुरारी, उगारितां वेत्र भयें थरारी ।
टाकूनि काठी मधुसूदनातें, बांधूं ह्मणे त्या निजनंदनातें ॥ ३९ ॥
न कामना ज्यास न वासनाही, प्रेमेंविना बंधन त्यास नाहीं ।
तें प्रेम वाहे हृदयांत माय, दाव्यांत तीच्या ह्मणऊनि माय ॥ ४० ॥

उखळबंधन.

सहृदय मातापित्यांनीं आणि प्रेमळ भक्तांनींच या खुमीदार वर्णनांतील रसास्वाद घ्यावा.

वनीं वाजवी वेणु जेव्हां मुरारी, व्रजीं चित्त कामें स्त्रियांचें थरारी ।
तया वर्णिती प्राण ठेवूनि कंठीं, वधूवृंद तो संकटें दीन कंठी ॥ २ ॥
अंगवक्र अधरीं धरि पांवा, गोपवेष हरि तोचि जपावा ।
वामबाहुवरि गालहि डावा, तो ठसा स्वहृदयांत पडावा ॥ ३ ॥
वेणु जेंवि अधरीं स्वररंध्रीं, अंगुली स्मरति गोपपुरंध्री ।
कोमळा सुचपळा अतिलंबा, सप्तही स्वररसा अविलंबा ॥ ४ ॥
ऐसिये हरिचिये मुरलीनें, कामतत्परमनें स्मरलीनें ।
मोहिलीं सहवधूत्रिदशांचीं, आमुचीं न नवलें सुदृशांचीं ॥ ५ ॥
गायनीं अमर जे अभिमानी, आणि देवललना स्वविमानीं ।

त्या स्त्रियांसहित दैत्यजनारी, मोहिलें ह्मणति या व्रजनारी ॥ ६ ॥
वेणुध्वनी तो सुरगायकांनीं, त्यांच्या विमानांतहि नायकांनीं ।
आश्चर्य कांनीं पडतांचि केलें, न तृप्त ज्यांचें मन हें भुकेलें ॥ ७ ॥
स्मरशरें विकळा सुरकामिनी, गलितनीविहि नेणति भामिनी ।
हरिस देखुनि त्या अधरामृता, त्वरित इच्छिति त्याविण ज्या मृता ॥ ८ ॥
कितीकी अशा बोलती गोपदारा, दुज्या गोपिका वर्णिती त्या उदारा ।
महाथोर आश्चर्य हें आयकाया, असें प्रार्थिती दूसऱ्या बायका या ॥ ९ ॥
आयका नवल हें अबळा हो, कीं स्थिरा घनिं विजा प्रबळा हो ।
हार ये रिती मुकुंद उरीं वो, देखतां न उरतेच उरी वो ॥ १० ॥
वास ज्यांनचि रमारमणीचा, श्याम ऊर वरि हार मणीचा ।
वेणुगान समयांत हरी तो, डोलतां जनमनास हरीतो ॥ ११ ॥
अधरिं वेणु धरी जइं तो हरी, विरहिणी जनचित्तहि मोहरी ।
व्रजवधूंसि खुणा व्रजराज तो, मुरलिमाजि वदोनि विराजतो ॥ १२ ॥
करूनी वियोगें मुखें दीनवाणीं, वसे तों विनोदें रमाकांतवाणी ।
अकस्मात त्या वेणुनें कर्णरंध्रीं, निवे सौख्य तत्काळ पावे पुरंध्री ॥१३॥
क्षण असें सुख पावति मागुती, त्वरित त्या अधरामृत मागती ।
जसजसा ध्वनि गोड गमे मना, तसितसी उपजे स्मरकामना ॥ १४ ॥
मोहती व्रजपशू मृग गाई, आमुचें नवल काय अगाई ।
स्तब्ध होति लिखितें जसिं चित्रें, वेणुच्या ध्वनिरसेंचि विचित्रें! ॥१५
ज्यांसि न स्मरण हस्तसदनांत, ग्रास ते न गिळिती वदनांत ।
निद्रितेंचि अथवा लिहिलीं हो, चित्रिचीं न गमती पहिलीं हो ॥ १६ ॥
मातृस्तनींचा रस आननांत, तों होय वेणुध्वनि कानानांत ।
गळें गिळेना पय वांसुरांतें, आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें ॥ १७ ॥
उचलुनि श्रवण श्रवणामृता, पशु पिती रस जीवन जो मृता ।
जवळि दूरहि वृंद अशा असे, मधुवनीं हरि जेथ उभा असे! ॥१८॥
वेणुसुधा.

पंडितांच्या या दोन्ही स्वभावोक्तींच्या वर्णनांचें हुबेहूब चित्र वाचकांच्या मनोनयनासंमुख किती उत्कर्षानें उभें रहातें हें त्यांनींच पहावें. अशा प्रकारचीं किंबहुना याहून सरस व विविध रसांनीं पूरित अशा वर्णनांनीं यांचे सर्वच ग्रंथ भरलेले आहेत. जें जें वाचावें त्यांत त्यांत वाच-

१ या ग्रंथांपैकीं गोपीगीत, रुक्मिणीपत्रिका, भागवतरामायण, ध्यानमाला.

कानीं तल्लीन होऊन जावें अशा प्रकारचीच यांची काव्यशक्ति. याचें कारण इतकेंच कीं, विषयाविवेचनाच्या भरांत किंवा वस्तुवर्णनाच्या प्रेमांत निमग्न असतां पंडित स्वतः तद्रूप होऊन जाऊन देहभान वि‍सरलेले असत, हें होय. यांच्या काव्यांत जे कांहीं प्रमाद ह्मणून आढळतात ते दोष, अशाच प्रसंगीं झालेले असल्यामुळें ते काव्यास सदोष करण्याबद्दल सुशोभित करितात असें आह्मांस वाटतें.

हा ग्रंथ हरीच करितो किंवा हें प्रकरण हरीनेंच केलें, अशा प्रकारचे पंडितांचे उद्गार त्यांच्या प्रत्येक ग्रंथांत सांपडतात, त्याचा स्पष्टार्थ त्यांनींच कर्मतत्त्वांत सांगितला आहे, तो असाः—

ज्याचें मुख द्विज असे पुरुषाख्यसूक्तीं,त्याचेंच कीं वदन वामन हे तदुक्ती।
विश्वात्मतेकरुनि तों दुसरें असेना, ग्रंथासि यासि करणार दुजा दिसेना २
जो सर्वबुद्धिगत चित्प्रतिबिंबरूपें, तो भक्तहृद्गत अनंत निजस्वरूपें ।
त्याच्या मुखेंचि उपदेशुनि आत्मविद्या, जीवांचिया हरि मुकुंद अनाद्यविद्या ३

यांच्या ग्रंथांत कोठें कोठें लहानसान व्याकरणप्रमाद आढळतात, ते असेः- संस्कृत शब्दांच्या र्‍हस्व दीर्घ उच्चारांकडे यांनीं लक्ष्य दिलें नाहीं. पद्यांतील

---

चतुःश्लोकी भागवत, अपरोक्षानुभूति व समश्लोकी गीता हीं भाषांतरें होत. ब्रह्मस्तुति,नामसुधा, यांनाही कोणी कोणी भाषांतरें ह्मणतात; परंतु तीं भाषांतरें नव्हत व समश्लोकी गीतेसही भाषांतर ह्मणतां येणार नाहीं. कारण कीं तिच्या अध्यायांच्या आरंभीं व शेवटीं जे संगतिश्लोक दिलेले आहेत त्यांची संख्या गीतेच्या मूळ श्लोकांच्या संख्येजवळ जवळ असून त्यांत विषयाची संगति लावण्यासाठीं जें पंडितांनीं पांडित्य खर्चिलें आहे त्याचाच एक स्वतंत्र ग्रंथ झाला आहे. हीं केवळ भाषांतरें आहेत, यांत पंडितांना बुद्धीचा काय व्यय करावा लागला ? असें जे ह्मणतात त्यांचें ह्मणणें घटकाभर खरें असें धरून जरी चाललों, तरी पंडितांचीं हीं भाषांतरें मुळासारिखींच किंवा त्यांहूनही सुरेख उतरल्यामुळें महाराष्ट्र जनांवर त्यांचे जे उपकार झाले आहेत ते आचंद्रार्क विसरण्याजोगे नव्हत. ते जर हल्लीं हयात असते तर माहाराष्ट्रियांस शेक्सपियर, मिल्टन, वर्ड्स्वर्थ इत्यादिकांचीं अमूल्य काव्यें जशाचीं तशीं किंबहुना उत्कर्षानें स्वभाषेंत वाचावयास सांपडलीं असतीं व मराठीभाषेचें आसन संस्कृत, ल्याटिन्, ग्रीक, फ्रेंच, इत्यादि भाषांच्या शेजारीं पडलें असतें व तीस जी विश्वविद्यालयाची पायरी वर्ज्य झाली आहे ती कधीं झाली नसती, असें आह्मांस खास वाटतें. मुळासारिखींच भाषांतरें उतरावयाची देखील पंडितांची हातवटी अझून कोणा माहाराष्ट्रियांत दिसून आली नाहीं, हें देशाचें दुर्दैव ह्मटलें पाहिजे.

एकादें उपयुक्त पद छंदोभंगास्तव क्वचित् समासांत मध्येंच घुसविलें आहे. वाक्याच्या स्पष्टार्थासाठीं समासाचीं पदें तोडून निराळीं केलीं आहेत. ‘ल्ज’ शब्दाचें निर्लज असें रूपांतर झालें आहे. हे काय ते यांचे हे कसे झाले असावेत हें आह्मीं वर सांगितलेंच आहे. मागाहून इकडे यांनीं लक्ष्य दिलें नाहीं, इतकेंच. यांना ह्मणजे हीं व्यंगें नीट करितां आलीं नसतीं असें कोणाच्यानेंही ह्मणवणार नाहीं. असे दोष कालिदास, शेक्सपियर इत्यादि महाकवींपासूनही झालेले आहेत, ह्मणून त्यांच्या काव्यांची किम्मत कमी झाली नाहीं. तद्वत् पंडितांच्याही काव्याची व्हायाची नाहीं.

आतां यांचीं नव्हेत अशीं कांहीं प्रकरणें वामनी ग्रंथांत यांच्या इतर प्रकरणांत मिसळून छापिलीं गेलीं, हें चुकीनें झालें; तथापि आमच्या चुकी बद्दल पंडितांस दोष लागावा हें अनुचित. याकरितां त्याविषयीं दोन शब्द सांगणें जरूर आहे.

सुदामचरित्र हें पंडितांचें नव्हे असें तें छापीत असतांच आमच्या लक्ष्यांत आलें व त्याविषयीं आह्मीं त्या प्रकरणाच्या आरंभीं जें कथेचें सार दिलें आहे त्यांत सांगितलेंच आहे. हें साम्राज्यवामनानें केलें. तो पंडितांचा शिष्य होता असें त्याच्याच ह्मणण्यावरून दिसतें:—

साम्राज्यवामन तयासहि वामनानें, केली कृपा अनुभवेंनिहि या मनानें ।
ऐश्वर्य सांसहित देहपुरींत ठेवी, ज्याची जनांस न कळे अनुभूतिठेवी ११३

सुदामचरित्र.

यानेंच पंडितांच्या अनुभूतिलेश नामक संस्कृत ग्रंथावर महाराष्ट्र टीका व ब्रह्मोपदेश अशीं दोन प्रकरणें केलीं आहेत. तीं आह्मीं ‘ वामन पंडितांच्या नांवावर मोडणारे ग्रंथ ’ या सदराखालीं छापिलीं आहेत. ब्रह्मोपदेशांत तो स्पष्ट असें सांगतो:—

१. हें सुदामचरित्र पंडितांचेंच असें घेऊन बाळकृष्ण मल्हार हंस यांनीं आपल्या वामनचरित्रांत जो पंडितांची या प्रकरणावरून फजीती उडविली आहे तिला सीमा नाहीं. परंतु असें करण्यापूर्वीं हें प्रकरण कोणाचें याचा यांनीं कांहीं तरी विचार करावयाचा होता. कारण, पंडितांच्या व या वामनाच्या विचारांत व भाषासरणींत जमीन अस्मानाचा फरक असतां यांच्यानें हें काव्य पंडितांचें ह्मणवलें तरी कसें? हे आमचे काव्यमर्मज्ञ. यांचे परीक्षक दक्षिणा प्रायझ् कमिटी, ज्यांनीं हें पुस्तक पसंत केलें व यांस या फजीत्याबद्दल दक्षिणा दिली, त्यांचेसारिखे काव्यमर्मज्ञ तर मिळायाचेच नाहींत !

पंचविंशति वर्षांतीं, श्रीसद्गुरु वामनाप्रती ।
शरण गेलों पुनरावृत्ती, जन्म मरण चुकवावया ॥ १३२ ॥
इति श्रीसद्गुरुचरणीं, साम्राज्यवामन अनुभववाणी ।
समर्पितां समर्पणीं, अद्वैतरूप जाहलें ॥ १३३ ॥

गोरसहरण, हें प्रकरण पंडितांचें नव्हे. यांत गणपति, सरस्वती इत्यादि अन्य देवतांचें मंगलाचरण केलें आहे. हें पंडितांच्या मतास विरुद्ध. याची भाषासरणीही पंडितांच्याहून निराळी आहे. हें कोणी नामधारी वामनानें आपली कवित्वशक्ति पहाण्यासाठीं केलें असावें, असें आह्मांस वाटतें.

नौकाचरित्र, हेंही प्रकरण पंडितांचें नव्हे. भाषासरणी मुळींच पंडितांची नाहीं. व्याकरणदोष फार आहेत. अशा प्रकारचे दोष त्यांच्या काव्यांत कोठें मिळायाचे नाहींत.

जयद्रथवध, पंडितांचा नव्हे. हा ज्या वामनानें विराटपर्व[1] केलें त्याचा असावा असें आह्मांस वाटतें. कारण कीं भाषासरणी कांहींशी तशी दिसते.

---

१ विराटपर्व पंडितांचें नव्हे असें कशावरून? तें त्यांचें पहिलेंच काव्य असावें. काव्यरचना करण्यास ते त्यावरून शिकले. पहिल्यानें अशीं निरस काव्यें होतां होतां पुढें पंडितांची हातवटी बसली असें कशावरून नसेल? असें कित्येकांचें ह्मणणें आहे. वामन हे महापंडित, पोक्त वयाचे, काशीहून परत आल्यापासून अनुग्रह होई तोंपर्यंत रात्रंदिवस आत्मज्ञानविचारांत गढून गेलेले, असेच त्यांना आह्मी पहात आलों. मलयाचल पर्वतावर अनुग्रह होऊन त्यांची समाधानवृत्ति होई तोंपर्यंत त्यांनीं कांहींच केलेलें दिसत नाहीं. जें कांहीं काव्य ह्मणून त्यांनीं केलें, तें, प्रेमळ सगुणभक्तीनें लोकांचीं मनें आत्मज्ञानाकडे सहजरीत्या वळून जें आपल्यास महाप्रयासानें प्राप्त झालें तें त्यांस सुलभ रीतीनें मिळावें, याच हेतूनें केलें. ती भक्ति व तें ज्ञान अंशतः तरी विराटपर्वांत दिसतें काय? मग विराटपर्व करण्याची पंडितांस जरूरी कसली होती? जे कवि असतात त्यांस काव्य करावयास शिकावें लागत नाहीं. त्यांची बुद्धीच विलक्षण असते. विलक्षण मानसिक सृष्टि जगाच्या मनोमय नेत्रांपुढें मांडून, त्या जगास त्यांतील सुख-दुःखाचे विभागी करायाला तिला यत्किंचितही आयास पडत नाहींत. हें शिकून किंवा घोकून व्हायाचें नाहीं. पंडितांस आत्मज्ञान झाल्यावर काव्य करायाचा अभ्यास करावा लागला असता तर त्यांकडून कांहींच झालें नसतें. कवीलाच काव्यस्फूर्ति व्हायाची, इतरांस नाहीं. वामन पंडित व मोरोपंत व्हायाला आजपर्यंत थोड्यांनीं प्रयत्न केले काय? परंतु कोणी तसे झाले नाहींत. या विराटपर्वकर्त्यानेंही पंडितांचें अनुकरण करण्याविषयीं फार प्रयत्न केलेले दिसतात, परंतु त्यांतील क्षुल्लक विचार, भाषासरणी, हिंदुस्थानी शब्द, अपरिचित

स्फुट श्लोकांतही साम्राज्यवामनाच्या व इतर वामनांच्या श्लोकांची बरीच मिसळ झालेली दिसते. याशिवाय दुसरीं प्रकरणें जीं जीं आह्मांस पंडितांचीं नव्हत अशीं वाटलीं, तीं तीं 'वामन पंडितांच्या नांवावर मोडणारे ग्रंथ' या सदराखालीं छापिलीं असल्यामुळें त्यांविषयीं विशेष लिहिण्याचें आतां कारण राहिलें नाहीं.

हें संक्षिप्त चरित्र बरेंच लांबलें, तरी पंडितांच्या अंतकालाविषयीं विचार केल्याविना आटोपल्यास तें अपूर्ण होईल. निगमसार ग्रंथ लिहिल्यावर पंडित फार दिवस जगले नाहींत, त्यांचा अंतकाल १५९५ च्या वैशाख शुद्ध षष्ठीस झाला, असें एका विद्वानानें जुन्या नवनीतांत लिहिलें, तेंच खरें मानून, अंधपरंपरेप्रमाणें सर्वत्र चरित्रकारांनीं तोच काल निश्चित केला; परंतु तो चुकीचा आहे.

निगमसार हा पंडितांच्या ओंवीबद्ध ग्रंथांत प्रथम ग्रंथ. यांत याचा समाप्तिशक १५९५ असा लिहिला आहे. असें पंडितांनीं आणखी कोणत्याच ग्रंथांत केलें नाहीं.

> शके पंधरा शतें पंचाणव, तैं ग्रंथ प्रगटला अभिनव ।
> जो अनादि अनुभव, सकळ संतांचा ॥ १६३ ॥
>
> निगमसार अ० ९.

निगमसारापूर्वी झालेलीं काव्यें कदाचित् अनुक्रमवार लावतां येणार नाहींत; परंतु त्या ग्रंथामागून झालेल्या कित्येकांचीं नांवें अनुक्रमानें देतां येतात; तीं अशीं:—

१ कर्मतत्त्व, २ ब्रह्मस्तुति, ३ समश्लोकी गीता, ४ गीतार्णवसुधा व ५ यथार्थदीपिका.

निगमसाराचा उल्लेख कर्मतत्त्वांत केला आहे, तो असा:—

> जो ग्रंथ वामनमुखें जगदात्मदेवें, केला असे निगमसार यथार्थ नांवें ।
> अभ्यास तेथ कथिले हरिभक्तिभावें, ते मानसीं धरुनि जीतचि मुक्त व्हावें ८९
>
> कर्मतत्त्व अ० ८.

कर्मतत्त्वाचा उल्लेख ब्रह्मस्तुतींत आहे:—

---

संस्कृत शब्द, र र, रे रे, गा गा, हो हो, मोठाल्या यमकांसाठीं निरर्थक शब्दांचा उपयोग इत्यादि व पंडितांचा प्रसाद, माधुर्य व अर्थालंकारादिकांचा त्यांत अभाव पाहून हें त्यांचें नव्हे अशी आमची खात्री झाली. हें कदाचित् सिद्धांतविजय नामक संस्कृत ग्रंथकर्त्या वामनाचें असेल तर कोण जाणे!

हें बिंब आणि प्रतिबिंब कैसें, विचार हा सारजगन्निवासें ।
भाषाप्रबंधीं स्फुट वर्णियेला, जो कर्मतत्त्वाख्य निबंध झाला ॥११२॥

ब्रह्मस्तुति चरण २.

पंडितांच्या बऱ्याच ग्रंथांचा उल्लेख समश्लोकी गीतेंत आहे; तथापि कामापुरता ब्रह्मस्तुतीविषयींचाच मात्र येथें घेतों:-

असो हें बोलतां ग्रंथ वाढेल बहु मागुतीं ।
ब्रह्मस्तुति त्रिचरणी टीका हे त्या स्थळीं पहा ॥ ३६ ॥

समश्लोकी गीता अ० १८ उपसंहार.

यामागून गीतार्णवसुधा झाली, कारण तींत समश्लोकी गीतेंतील कांहीं पद्यें जशाचीं तशीं उदाहरणार्थ उतरून घेतलीं आहेत.

समश्लोकी गीतेनंतर यथार्थदीपिका झाली. हें पुढील श्लोकावरून सिद्ध होतें:-

गीतार्थ वर्णितां ग्रंथ वाढेल अपरांपर ।
समश्लोकी प्रतिज्ञा हे केली यास्तव माधवें ॥ ९ ॥

समश्लोकी गीता. अ० १८. उपसंहार.

एथपर्यंत यथार्थदीपिका झाली नव्हती. झाली असती तर असें न बोलतां पंडितांनीं तिजवर हवाला दिला असता.

शिवाय निगमसार, कर्मतत्त्व व ब्रह्मस्तुति यांचा उल्लेख यथार्थदीपिकेंत केला आहे तो असा:-

ग्रंथ निगमसार ह्मणोनी, भगवंतें याच वामनमुखें करोनी ।
प्रगट केला तेथें अपसिद्धांत हे दूषूनी, वैदिकसिद्धांत ते सिद्ध केले ॥६०३

---

१ श्रुतिसार ह्मणून पंडितांचा एक संस्कृत ग्रंथ आहे, त्यांत शुष्कद्वैतवाद्यांचा पक्ष दूषिला आहे, असें पंडित स्वतः सांगतात. ( सम० गी० अ० १२ उपो० श्लो० ८४. ) हाही ग्रंथ निगमसारामागून झाला असावा असें वाटतें. ह्यांत अनुभूतिलेशाप्रमाणेंच पंडितांविषयीं कांहीं विशेष माहिती मिळेल ह्मणून ह्यासाठीं आह्मी फार प्रयत्न केले, परंतु ते सर्व व्यर्थ झाले. पंडितांचा आणखी एक श्रुतिकल्पलता नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ आहे, असें जुन्या नवनीतांत व कविचरित्रांत सांगितलें आहे; परंतु याचा उल्लेख त्यांच्या कोणत्याच ग्रंथांत केलेला आढळत नाहीं, व तो पाहिल्याचेंही कोणी सांगत नाहीं. जर अशा प्रकारचा ग्रंथ असेल तर तो यथार्थदीपिकेच्याही मागून झाला असावा. आह्मीं तो मिळवायास पुष्कळ यत्न केले परंतु ते सर्व निष्फळ झाले.

कर्मतत्त्व ग्रंथीं हा विचार, भगवंत जो यथार्थदीपिकाकार।
याणेंच केला असे येथें फार, बोलतां अपार ग्रंथ होतो ॥ ९६१ ॥
ब्रह्मा यास दृष्टांत, बोले तें वर्णितां असे अत्यंत।
वामनरूपेंच भगवंत, टीकाकार या स्तुतीचा ॥ २१८ ॥
यथार्थदीपिका अ० १५.

समश्लोकी गीतेचा यथार्थदीपिकेंत उल्लेख करण्याचें कांहीं कारण नव्हतें ह्मणून केला नाहीं; तथापि ती सर्व ग्रंथांमागून व यथार्थदीपिकेच्या पूर्वी झाली हें वर सिद्ध झालेंच आहे.

७ गाशिवाय यथार्थदीपिकेचा उल्लेख पंडितांच्या कोणत्याच ग्रंथांत नाहीं ह्मणून ती सर्व ग्रंथांमागून झाली. यांत संशय नाहीं.

निगमसार १५९५ त झाला. त्यामागून हे मोठाले ग्रंथ पंडितांनीं रचिले. यांतील श्लोकबद्ध प्रकरणांचा २.८६६ ग्रंथ आहे व यथार्थदीपिकेचा ओवीबद्ध ग्रंथ २२,२६६ आहे. यांची फक्त नकलच करायाला चांगल्या लेखकास निदान दोन वर्षें तरी लागतील; तर पंडितांना यांची रचना करावयास किती वर्षें लागलीं असावीं याचें वाचकानींच अनुमान काढावें.

पंडितांचा परंधामगमनकाल निश्चित करण्याचें साधन जरी आज राहिलें नाहीं, तरी तो शके १६०० च्या नंतर झाला, यांत संशय नाहीं. जुन्या नवनीतांतील निबंधकारानें दिलेला काल शके १५९५, हा १६१५ असावा. तो त्यास फार जुनाट लेखावरून मिळाला असल्यास त्यांतील मधले दोन आंकडे, ह्मणजे ६१, बालबोधलिपीच्या वळणाच्या संबंधानें किंवा कालगतीच्या झपाट्यांत सांपडून ह्या दोन आंकड्यांच्या वरला किंचित् भाग जीर्ण होऊन गळून पडल्यानें अथवा तो भाग क्रिमीनें खाल्यामुळें, सहांचा आंकडा पांचांसारिखा आणि एकाचा आंकडा नवांसारिखा ह्मणजे ५९, दिसायाचा संभव आहे. यांतील एखाद्या कारणावरून त्याला हा शक १५९५ असावा असें भासलें; व ह्या त्याच्या भासास निगमसाराच्या समाप्तिशकानें निश्चितपणाचें रूप दिलें; असें आह्मांस वाटतें. या निबंधकारानें पंडितांचे सर्व उपलब्ध ग्रंथ वाचले नसावे. कार्यापुता त्यांचा शेवटला भाग ग्रंथसमाप्तिकाल पहाण्यासाठीं चाळून पाहिला असावा व तो फक्त निगमसारांतच सांपडल्याकारणानें हाच पंडितांचा शेवटला ग्रंथ आहे असा त्याचा ग्रह झाला असावा. असें नसतें तर त्यानें, 'निगमसार ग्रंथ समाप्त झाल्यावर वामन पंडित फार दिवस जगला नाहीं.' असें ह्मटलें नसतें.

गिराबाई पंडितांच्या पूर्वी निवर्तल्या, व मागून त्यांनीं संन्यास घेतला असावा, ह्मणूनच त्यांना महिपतिबोवा, मोरोपंत वगैरे कवि, वामनस्वामी असें ह्मणतात, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. हें आह्मांस संमत नाहीं. सर्व कर्में ईश्वरार्पित करण्यानें जसा संन्यास घडतो तसा मुंडनादि करून केवळ चतुर्थाश्रमदीक्षाच घेतल्यानें तो साधतो असें नाहीं, असें पंडितांनीं आपलें मत ठिकठिकाणीं व्यक्त केलें असून, तेच शेवटीं संन्यास घेतील, असें आह्मांस वाटत नाहीं; कारण त्यांचेसारिखे दृढनिश्चयी पुरुष क्वचित् उपजतात. शिवाय एकनाथस्वामी गृहस्थाश्रमी असून त्यांसही लोक स्वामी ह्मणत असत, यावरून त्या कालीं संतमंडळीस सन्मानार्थ स्वामी ह्मणण्याचा प्रघात होता असें दिसतें.

यांचा काल कोरेगांवांतच झाला व ज्या ठिकाणीं यांचें उत्तरकार्यादि झालें त्या ठिकाणीं यांची समाधि बांधिली आहे.